# भाजपची 'मविआ'ला पुन्हा धोबीपछाड

मंगळवार, २१ जून २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३३४
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

उरणमधील ८४ धोकादायक इमारतींना पालिकेची नोटीस/२
वरुणराजाचा बळीराजाला दिलासा; कामांना वेग/५
डायमंड लीगसाठी नीरज चोप्रा उत्सुक/८



## विधान परिषद निवडणुकीत पाचही उमेदवार विजयी

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यसभा निवडणुकीप्रमाणे विधान परिषद निवडणुकीतही भारतीय जनता पक्षाने शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या तीन पक्षांच्या महाविकास आघाडीला पुन्हा एकदा मात देत बाजी मारली आहे. भाजपचे पाचही उमेदवार निवडून आले. सलग दुसऱ्या पराभवामुळे महाविकास आघाडीच्या गोटात खळबळ माजली आहे.**

विधान परिषदेच्या नऊ सदस्यांचा कार्यकाळ ७ जुलै रोजी संपणार आहे, तर या वर्षाच्या सुरुवातीला भाजपच्या एका सदस्याच्या मृत्यूमुळे १०व्या जागेसाठी निवडणूक झाली. भाजपचे पाच, तर आघाडीचे सहा (शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांचे प्रत्येकी दोन) असे एकूण ११ उमेदवार रिंगणात होते. या निवडणुकीसाठी सोमवारी (दि. २०) मतदान प्रक्रिया झाली. सकाळपासून आमदार मतदान करण्यासाठी विधानभवनात येत होते. सायंकाळपर्यंत भरघोस मतदान झाले.




राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेच्या एका उमेदवाराचा पराभव झाला होता, तर दुसरीकडे पुरेसे संख्याबळ नसूनही भाजपचे तिन्ही उमेदवार निवडून आले होते. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीत जबरदस्त चुरस दिसून आली. अखेर या निवडणुकीत राज्यसभा निवडणुकीची पुनरावृत्ती झाली.

भाजपचे उमेदवार तथा विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी मंत्री राम शिंदे, आमदार प्रसाद लाड, प्रदेश सरचिटणीस श्रीकांत भारतीय आणि महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष उमा खापरे हे पाचही उमेदवार विजयी झाले. त्याचप्रमाणे शिवसेनेचे उमेदवार माजी राज्यमंत्री सचिन अहिर आणि नंदुरबारचे स्थानिक नेते आमश्या पाडवी निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेसचेही ज्येष्ठ नेते रामराजे नाईक-निंबाळकर आणि एकनाथ खडसे जिंकले, मात्र काँग्रेसचे उमेदवार तथा माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे यांचा पराभव झाला. काँग्रेसचे अन्य उमेदवार आमदार भाई जगताप विजयी झाले आहेत.

### काँग्रेसचा आक्षेप निवडणूक आयोगाने फेटाळला

भाजपचे आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार मुक्ता टिळक यांच्या मतदानावर काँग्रेसने आक्षेप घेतला होता. याबाबतची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती, मात्र निवडणूक आयोगाने काँग्रेसचे आरोप फेटाळून लावले. आमदार जगताप व आमदार टिळक हे आजारी असल्याने त्यांनी निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन मतदानासाठी सहाय्यकाची मदत घेतली होती. ती आयोगाने ग्राह्य ठरविली.

### मलिक, देशमुख मतदानास पुन्हा मुकले

राज्यसभेप्रमाणे विधान परिषद निवडणुकीत मतदान करण्यास राष्ट्रवादीचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि मंत्री नवाब मलिक यांनी सर्वोच्च न्यायालयाने मज्जाव केला. मतदान करण्यास परवानगी मिळावी यासाठी हायकोर्टात दाखल याचिका फेटाळून लावल्यानंतर देशमुख, मलिकांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती, मात्र तिथेही त्यांना दिलासा मिळू शकला नाही.

## कोकण रेल्वेच्या विद्युतीकरणाचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकण रेल्वेच्या विद्युतीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले असून त्याचे सोमवारी (दि. २०) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. आता कोकण रेल्वेतील प्रवाशांचा प्रवास अधिक जलद होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे पाच राष्ट्रीय महामार्ग आणि सात रेल्वे प्रकल्पांचे लोकार्पण करण्यात आले आहे. कोकण रेल्वेने विद्युतीकरण आणि दुपदरीकरणा काम पूर्ण केले आहे. यासाठी पंतप्रधान मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनीकुमार वैष्णव यांनी कोकण रेल्वेच्या कामगिरीचे कौतुक केले.

# पनवेल झोपडपट्टीमुक्त महापालिका होण्याचा मार्ग मोकळा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रकल्प अहवालास मंजुरी मिळाल्याने झोपडपट्टीमुक्त महापालिका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पनवेलमध्ये भरपूर हवा व स्वच्छ सूर्यप्रकाश असलेला रोज बाजार उपलब्ध होणार आहे. घरोघरी जाऊन दिव्यांगांचे सर्वेक्षण होणार असून सायन-पनवेल महामार्गावरील अंधार दूर होऊन हा महामार्ग उजळणार आहे. या सर्व विषयांना महापालिकेच्या सोमवारी (दि. २०) झालेल्या महासभेत मंजुरी देण्यात आली आहे. महापालिकेच्या पहिल्या पाच वर्षांच्या कार्यकाळाची मुदत जुलै महिन्यात संपत असल्याने ही महासभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली.

पनवेल महापालिकेची सर्वसाधारण सभा सोमवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि सदस्य उपस्थित होते.

### महामार्गावरील अंधारही होणार दूर; महासभेत मंजुरी



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

या सभेत सिडको वसाहतीतील नगरसेवकांनी पाण्याचा प्रश्न मांडला तसेच महापालिका कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळावी, अशी मागणीही नगरसेवकांनी केली. **(पान २ वर..)**

**रोज बाजार म्हटले की सगळीकडे अंधार, जळमटे असे कोंदट वातावरण ठरलेले असते, पण पनवेलकरांसाठी प्रभाग १९मध्ये बांधण्यात येणारा रोज बाजार हा भरपूर उजेड, मोकळी हवा आणि स्वच्छ असलेला अनुभवायला मिळणार आहे. त्या दृष्टीने त्याचा आराखडा बनवण्यात आला आहे. झोपडपट्टीवासीयांना पंतप्रधान आवास योजनेतून घरे मिळावी म्हणून तिसऱ्या टप्प्याला मंजुरी मिळाल्याने लवकरच त्याच्याही कामाला सुरुवात होईल. दिव्यांगांचे सर्वेक्षण झाल्याने जास्तीत जास्त दिव्यांगांना शासकीय योजनांचा लाभ घेता येणार आहे.**

**-परेश ठाकूर, सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका**

## निवडक

### मुसेवाला हत्येप्रकरणी तीन शूटर्सना अटक

**नवी दिल्ली** : पंजाबी गायक आणि काँग्रेस नेता सिद्धू मुसेवाला याच्या हत्या प्रकरणात दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने शूटर्सच्या मॉड्यूल प्रमुख प्रियव्रत फौजीसह अन्य दोन शुटर्सना गुजरातमधील मुंद्रा येथून अटक केली आहे. ते लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित आहेत. त्यांच्याकडून पोलिसांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि स्फोटकेही जप्त केली आहेत.

### मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया

**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर सोमवारी (दि. २०) हिप बोनची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली असून पुढचे दोन ते तीन महिने त्यांना आराम करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. या दरम्यान राज यांना कोणतीही सभा किंवा बैठक घेता येणार नाही, असे त्यांच्यावर यशस्वी करणारे डॉ. जलील पारकर आणि डॉ. विनोद अग्रवाल यांनी सांगितले.

## सांगलीत एकाच कुटुंबातील नऊ जणांची आत्महत्या



**सांगली : प्रतिनिधी**

सांगली जिल्ह्यातील मिरजजवळील म्हैसाळ येथे एकाच कुटुंबातील नऊ जणांनी सामूहिक आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आर्थिक विवंचनेतून या सर्वांनी आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

माणिक येलाप्पा वनमोरे (डॉक्टर) आणि पोपट येलाप्पा वनमोरे (शिक्षक) या दोन भावांनी आपल्या कुटुंबासहित आत्महत्या केली. मृतांमध्ये त्यांची आई आक्काताई वनमोरे, माणिक वनमोरे यांची पत्नी रेखा, मुलगी प्रतिमा, मुलगा आदित्य, पोपट वनमोरे यांची पत्नी अर्चना, मुलगी संगीता, मुलगा शुभम अशी यांचाही समावेश आहे. या सर्वांचे मृतदेह सोमवारी (दि. २०) सकाळी आढळल्यानंतर खळबळ उडाली आहे.

म्हैसाळ येथील नरवाड रोडजवळ असलेल्या अंबिकानगर चौकातील आलगत मळ्यात डॉ. वनमोरे कुटुंबासह राहतात. अंबिकानगरमध्येच या कुटुंबाचे एक, तर राजधानी कॉर्नर येथे दुसरे घर आहे. सोमवारी सकाळपासून दोन्ही घरांचा दरवाजा उघडा नव्हता. आसपास राहणाऱ्या शेजाऱ्यांनी दरवाजा उघडून पाहिला असता एकाच घरात सहा जण विष घेऊन आत्महत्या केल्याचे दिसून आले. त्यानंतर दुसऱ्या घरात तिघांचे मृतदेह मिळून आले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## अग्निवीर भरतीसाठी अधिसूचना जारी

### जुलैपासून होणार नोंदणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय लष्कराने अग्निपथ भरतीसंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. भरतीसाठी जारी केलेल्या या अधिसूचनेनुसार जुलैमध्ये यासाठी नोंदणी सुरू होणार आहे.

भारतीय लष्कराच्या अधिसूचनेनुसार आठवी आणि दहावी उत्तीर्ण युवकही यासाठी अर्ज करू शकणार आहेत. अग्निवीर म्हणून निवड होण्यासाठी सर्व उमेदवारांना ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करावी लागणार आहे.

पात्र आणि इच्छुक उमेदवार लष्कराच्या joinindianarmy.nic.in या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन अर्ज करू शकतात, असे कळविण्यात आले आहे.

## माणगावमध्ये गावठी बॉम्ब आढळले

### दुकलीला अटक

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील पाणसई आदिवासी वाडीत गावठी बॉम्बसह ते तयार करण्याचे साहित्य आढळले आहे. या प्रकरणी माणगाव पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

पाणसई आदिवासी वाडीत बॉम्बचा साठा असल्याची माहिती माणगाव पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने रविवारी (दि. १९) रात्री तेथे जाऊन पाहणी केली असता बाबू दगडू जाधव (वय ५०) याच्या ताब्यातील एका प्लास्टिकच्या बरणीत ठेवलेले आठ गावठी बॉम्ब तसेच दुसऱ्या प्लास्टिकच्या पिशवीत सुमारे स्फोटके तयार करण्यासाठी वापरण्यात येत असलेली पावडर आढळली. त्यामुळे पोलिसांनी अलिबाग येथून बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच ब्रुनो नावाच्या श्वानास पाचारण करून तपासणी व खात्री करण्यात आली.



(छाया : सलीम शेख)



या प्रकरणी आरोपी बाबू जाधव आणि त्याला मदत करणारा त्याचा साडू राम यशवंत वाघमारे (वय ४९, रा. विळा ता. माणगाव) यांना अटक केली. त्यांना चासलाल (पूर्ण नाव माहीत नाही, रा. मध्य प्रदेश) हा गावठी बॉम्ब तयार करण्यासाठी लागणारी सामुग्री पुरवितो तसेच स्वतःही बॉम्ब तयार करून विकत असतो. या तिन्ही आरोपींविरुद्ध माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तिसरा आरोपी चासलालचा शोध सुरू आहे.

डुक्कर किंवा तत्सम जंगली प्राण्यांची शिकार करण्यासाठी हे बॉम्ब तयार करण्यात आले होते, अशी प्राथमिक माहिती हाती लागली आहे. आदिवासी स्वतःच असे बॉम्ब तयार करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## जागतिक योग दिनानिमित्त योगासने व स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक योग दिनानिमित्त मंगळवारी (दि. २१) सकाळी ६ वाजता भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत माची प्रबळगड येथे योगासने करण्याची संधी मिळणार असून योग दिनाचे औचित्य साधून प्रबळगड येथे स्वच्छता मोहीमही राबविली जाणार आहे.

२१ जून हा जागतिक योग दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. त्या अनुषंगाने माची प्रबळगड येथे होणाऱ्या या कार्यक्रमात पनवेलच्या आरोग्य सेवा समितीचे योग केंद्र प्रमुख सूर्यकांत फडके, सहशिक्षक अरविंद गोडबोले योगसाधनेसंदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत युवा व ज्येष्ठ योगासने करणार आहेत. त्यानंतर प्रबळगड येथे स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.



# विमानतळाला 'दिबां'चेच नाव लागणार!

## सिडको घेराव आंदोलनाची नवी मुंबईतही जोरदार तयारी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती आयोजित २९ गाव संवाद बैठकीच्या पार्श्वभूमीवर कोपरखैरणे येथील शेतकरी समाज मंदिर सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कृती समितीचे कार्याध्यक्ष माजी खासदार संजीव नाईक यांनी नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव द्यावेच लागेल, असे ठणकावून सांगत येत्या २४ जून रोजी पुनःश्च एकदा विमानतळ नामकरणासह प्रलंबित मागण्यांसाठी भूमिपुत्र, शहरवासीय आणि झोपडपट्टीधारक एकत्रितरीत्या राज्य शासनाच्या विरोधात शांततेच्या मार्गाने सिडको घेराव आंदोलन करणार असल्याचे सांगितले.

मुख्य कृती समिती अंतर्गत नवी मुंबई महापालिका समन्वय समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत व्यासपीठावर सहचिटणीस संतोष केणे, सदस्य दशरथ भगत, डॉ. राजेश पाटील, मनोहर पाटील, दीपक पाटील, नवी मुंबई क्षेत्र समन्वयक शैलेश घाग, सुनील पाटील, शिवचंद्र पाटील, सुरेश वास्कर, प्रकाश पाटील, साईनाथ पाटील, शशांक कट्टे आदी उपस्थित होते.



लोकनेते दि. बा. पाटील नामकरण आंदोलन हा महाविकास आघाडीने ओढवून घेतलेला प्रश्न आहे. 'दिबां'च्या सर्वपक्षीय शोकसभेत नामकरण ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला होता. मग त्यांच्या नामकरण प्रस्तावावर निर्णय घेण्यास मुख्यमंत्री विलंब का लावत आहे, असा सवाल या वेळी संजीव नाईक यांनी उपस्थित केला.

दशरथ भगत यांनी सांगितले की, २४ जूनचे सिडको घेराव आंदोलन हे पुनश्च एकदा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी राज्य सरकारला इशारा देणारे असणार आहे. या आंदोलनात आगरी, सागरी व शहरातील भूमिपुत्र आपली एकजूट दाखवणार आहेत. नामकरण आंदोलन हे देशातील स्वामित्वाच्या हक्काचा केंद्रबिंदू ठरले आहे. आम्ही गांधी मार्गाचा अवलंब करून शांततेत आंदोलन करू, मात्र आंदोलनाचे रूपांतर उद्रेकात करायचे काय हे शासनाने ठरवावे.

डॉ. राजेश पाटील म्हणाले की, नवी मुंबईतील स्थानिक कष्टकरी, शेतकरी यांच्या अस्मितेसाठी शासनाने 'दिबां'ची कर्मभूमी असलेल्या भूमीवर साकारत असलेल्या विमानतळाला त्यांचे नाव द्यावे, अशी आग्रही मागणी स्थानिक भूमिपुत्र सातत्याने करीत आहेत. नामकरण तसेच भूमिपुत्रांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत मुंबई, ठाणे, रायगड, पालघर आदी जिल्ह्यांतील भूमिपुत्र एकसंघ होऊन आपली शक्ती शासनास दाखविणार आहेत.

## संत तुकोबांच्या पालखीचे प्रस्थान

**देहू : प्रतिनिधी**

टाळ-मृदंगाच्या तालावर होणारा विठूनामाचा गजर... तुळशी वृंदावन आणि दिंड्या-पताका... अशा भक्तिमय वातावरणात आषाढी वारीसाठी श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने सोमवारी (दि. २०) पंढरपूरकडे प्रस्थान केले. महापुजेनंतर पालखीने इनामदार वाड्यातील मुक्कामाकडे प्रस्थान केले.

दोन वर्षांनंतर पायी वारी होत असल्याने वारकऱ्यांमध्ये अमाप उत्साह दिसून आला. बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जयच्या गजरात सोमवारी देहूनगरी दुमदुमली. विठूरायाच्या भेटीसाठी वारकरी आतूर झाले असून पंढरीला जाण्यासाठी सज्ज झाले आहेत.

# काँग्रेसची तक्रार असंवेदनशील

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची नाराजी



**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसची तक्रार म्हणजे असंवेदनशील प्रकार असल्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. भाजपचे आमदार लक्ष्मण जगताप आणि मुक्ता टिळक यांचा विषयी काँग्रेसने तक्रार केली होती. देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसच्या तक्रारीवर नाराजी व्यक्त केली.

लक्ष्मण जगताप आणि मुक्ता टिळक या आमदारांऐवजी त्यांचेसमवेत इतर सहकाऱ्यांनी मतपत्रिका बॉक्समध्ये टाकल्या, असा आक्षेप काँग्रेसकडून घेण्यात आला. मुक्ता टिळक आणि लक्ष्मण जगताप यांना सहाय्यकाची गरज लागेल, हे पाहताक्षणी कुणाच्याही सहज लक्षात येईल. त्यामुळे आम्ही व्हीलचेअर आणि सहाय्यकासाठी निवडणूक आयोगाकडून रितसर परवानगी घेतली होती. तरीही काँग्रेसने असा आक्षेप घेणे दुर्दैवी आहे.

पुण्यातील भाजपच्या आमदार मुक्ता टिळक या कॅन्सरने त्रस्त आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत, मात्र तरीदेखील मतदान करण्यासाठी त्या विधानभवनात आल्या होत्या. पक्षाने दिलेले आदेश मानायचे हे पहिल्यापासून आमच्या रक्तात आहे. त्यामुळे मतदान केल्याचे मुक्ता टिळक यांनी म्हटले, तसेच भाजप आमदार लक्ष्मण जगताप हेदेखील काही महिन्यांपासून आजारी आहेत. त्यांच्यावरही उपचार सुरू आहेत, पण अशातही आपल्या पक्षाच्या उमेदवाराला मतदान करण्यासाठी ते मुंबईत आले होते.

### प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्याकडूनही टीका



**भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनीही ट्वीट करीत काँग्रेसच्या आरोपांना उत्तर दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, मुक्ता टिळक आणि लक्ष्मण जगताप यांना सहाय्यकाची गरज लागेल, कुणाच्याही सहज लक्षात येईल. निवडणूक आयोगाकडून रितसर पूर्व परवानगी घेतली होती, तरीही काँग्रेसने असा आक्षेप घेणे त्यांची पराभूत मानसिकता दाखवणारा आहे, असे चंद्रकांत पाटील म्हणाले आहेत.**

# उरण शहरातील ८४ धोकादायक इमारतींना नगरपालिकेची नोटीस

## १४ इमारती अतिधोकादायक, तर ६४ इमारती धोकादायक

**उरण : वार्ताहर**

उरण शहरात १४ इमारती अतिधोकादायक असून ६४ इमारतींची दूरवस्था झाली आहे. एकूण ८४ इमारतीची पडझड झाल्याने या इमारतीमधील रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन उरण नगर परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

नगर परिषदेच्या वतीने या अगोदरही जीर्ण झालेल्या इमारतींमधील रहिवाशांनी सुरक्षित ठिकाणी आपल्या कुटुंबासह स्थलांतरीत व्हावे, असे नोटिसीच्या माध्यमातून सूचित केले आहे. तरीही धोकादायक इमारतीमधील रहिवाशी आपल्या कुटुंबाचा जीव धोक्यात घालून वास्तव्य करीत असल्याचे चित्र सर्रास पहावयास मिळत आहे. नगर परिषदेकडून सांगण्यात येत आहे की, शहरात एकूण ८४ इमारती धोकादायक आहेत. त्यातील १४ इमारती या अतिधोकादायक असून ६४ इमारतींची दूरवस्था झाली आहे. या संदर्भात इमारतींना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

**उरण नगर परिषद हद्दीत १४ इमारती या अतिधोकादायक असून ६४ धोकादायक आहेत. त्यामध्ये राहणाऱ्यांना येथे राहू नका धोकादायक आहे. अशा प्रकारच्या नोटिसा दिल्या आहेत. मालकांनाही नोटिसा दिल्या आहेत.**

**–संतोष माळी, मुख्याधिकारी, उरण नगर परिषद**



# पनवेलमध्ये ५६ हजार ४६८ बालकांनी घेतला पोलिओचा डोस

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात रविवारी (दि. १९) राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात आली. यामध्ये ० ते ५ वयोगटातील ५६ हजार ४६८ बालकांना पोलिओ लसीकरण करण्यात आले. महापौर डॉ. कविता चौतमोल व आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागाने पोलिओ लसीकरणाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले.

० ते ५ वयोगटातील अपेक्षित ६७ हजार ८०२ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य ठेवून मोहिमेचे नियोजन करण्यात आले होते, त्यातील ५६ हजार १२२ बालकांचे पोलिओ लसीकरण करण्यात आले. त्याकरिता सहा नागरी आरोग्य



केंद्रांच्या क्षेत्रात ३३१ स्थायी, २४ ट्रान्झिट व ४४ फिरते मोबाइल असे एकूण ३९९ पोलिओ लसीकरण बूथ कार्यरत होते.

या लसीकरण मोहिमेसाठी स्थायी, रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड अशा ठिकाणी ट्रान्झिट व मोबाईल पथके तयार करण्यात आली होती, तसेच सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवरती लसीकरणाची सोय करण्यात आली होती. वैद्यकीय अधिकारी, एएनएम, आशा व स्वयंसेवक यांचे प्रशिक्षण घेण्यात आले होते. कोविड सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून योग्य पद्धतीने लसीकरण करण्याचे निर्देश सर्वांना देण्यात आले होते. वैद्यकीय आरोग्य विभागाचे मुख्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांनी या लसीकरणाचे सूक्ष्म नियोजन केले होते.

या पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत राहिलेल्या वंचित बालकांना महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने पुढील पाच दिवस पोलिओ लसीकरण करण्यात येणार आहे.

## योग दिनानिमित्त खारघरमध्ये कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथे जागतिक योग दिनानिमित्त पनवेल मनपा नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्या वतीने नागरिकांसाठी योगासने तसेच योगाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

खारघर सेक्टर १५ येथील बुद्धविहार येथे सकाळी ६ वाजता नागरिकांना योगासनांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात येणार असून त्यांना याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. त्यामुळे या कार्यक्रम शिबिराचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन नगरसेवक निलेश बाविस्कर यांनी केले आहे.

# खारघर, तळोजा, द्रोणागिरी, उलवे येथील पाणीपुरवठा सुरळीत; सिडकोचा दावा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसंस्था**

सिडकोच्या हेटवणे पाणीपुरवठा योजनेतील दाब विमोचकाचे (प्रेशर कंड्युट) काम पूर्ण झाल्याने हेटवणे पाणीपुरवठा योजनेद्वारे नवी मुंबईला अतिरिक्त ३० एमएलडी पाणीपुरवठा करणे शक्य झाले आहे. यामुळे सिडको अधिकार क्षेत्रातील नोड आणि गावांना होणारा पाणीपुरवठा सुरळीत झाला आहे, असे सिडकोने आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

नवी मुंबईतील सिडको अधिकार क्षेत्रातील खारघर, उलवे, तळोजा, द्रोणागिरी, जेएनपीटी बंदर, दिघोडे एमआयडीसी या परिसरास सिडकोच्या नोड्सना हेटवणे धरण, नवी मुंबई महानगरपालिकेचे मोर्बे धरण, मजीप्राची पाताळगंगा आणि न्हावा–शेवा योजना आणि एमआयडीसीचे बारवी धरण या जलस्रोतांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. येथे पाण्याची मागणी २८९ एमएलडी आहे, परंतु प्रत्यक्षात सिडकोला या विविध स्रोतांद्वारे २५९ एमएलडी पाणी उपलब्ध होत असून ३० एमएलडीचा तुटवडा भासत आहे.

याबाबत मे. टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स लि. (टीसीई)कडून हेटवणे योजनेतून अतिरिक्त ३० एमएलडी पाण्याचा तातडीने उपसा करता यावा याकरिता सध्याच्या ५० मीटर लांबीच्या खुल्या प्रणाली निर्गमाऐवजी ५६ मीटर लांबीच्या बंद दाब विमोचकाची शिफारस करण्यात आली. त्यानुसार दाब विमोचक कार्यान्वित झाला आहे. यामुळे हेटवणे पाणीपुरवठा योजनेतून अतिरिक्त ३० एमएलडी पाण्याचा उपसा करणे शक्य झाले आहे, असा दावा सिडकोने केला आहे.

**सिडकोद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या नोड आणि गावांतील पाणीपुरवठा सुरळीत व्हावा याकरिता सिडकोकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. सिडकोने १५ दिवसांच्या कालावधीत दाब विमोचकाचे काम युद्धपातळीवर पूर्ण केल्याने हेटवणे धरणातून तातडीने अतिरिक्त ३० एमएलडी पाणीसाठा उपलब्ध झाला आहे.**

**–डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# कोकणात मुसळधार पावसाचा इशारा | सर्वांत मोठा दिवस झाकोळण्याची शक्यता

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील चार दिवस कोकणात मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे २१ जून हा सर्वांत मोठा दिवस झाकोळला जाण्याची शक्यता आहे.

**हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, रविवारपासून पुढील चार दिवस कोकणात मुसळधार पावसाची शक्यता आहे. सोमवारी सकाळी १० वाजता संपलेल्या मागील २४ तासांत रायगड जिल्ह्यात सरासरी १७.७ मिमी इतक्या सरासरीने पाऊस पडला आहे. सोमवारी सकाळपासूनच सर्वत्र ढगाळ वातावरण असून पावसाची संततधार सुरू असल्याने जिल्ह्यातील नागरिकांना सूर्यदर्शन अनुभवता येणार नाही.**

मंगळवारचा दिवस सव्वातेरा तासांचा, तर रात्र पावणेअकरा तासांची असेल, मात्र पावसामुळे रायगडमधील नागरिकांना निसर्गाचा आविष्कार अनुभवता येण्याची शक्यता कमी आहे.

रविवारी दुपारपासून जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे दिवसभर ढगाळ वातावरण होते. सूर्याच्या दक्षिणायन आरंभामुळे २१ जून हा सर्वात मोठा दिवस व रात्र सर्वात लहान असेल, असे अभ्यासकांकडून सांगण्यात येत आहे. त्यानंतर दिवस हळूहळू लहान होत जाणार आहे.

यंदा २२ जूनपासून सूर्य आर्द्रा नक्षत्रात मेंढा वाहनाने प्रवेश करीत आहे. कोकणातील शेतकरी पूर्वी सूर्याची नक्षत्रस्थिती आणि वाहनावरून पावसाचा अंदाज वर्तवायचे. हजारो वर्षांपासून सुरू असलेली पंचांगावर वयोवृद्ध माणसे चर्चा करताना दिसतात.


**उरण नगरपरिषद**
**जिल्हा रायगड**
**जाहीर सूचना**

ज्या अर्थी महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११ अन्वये उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२२ करिता मतदार यादी तयार करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांनी मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

आणि ज्या अर्थी मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेशान्वये व ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक ३१/०५/२०२२ रोजी अस्तित्वात असलेल्या विद्यानसभा मतदार संघाच्या यादीवरुन उरण नगरपरिषदेच्या प्रभाग क्र.१ ते १० या प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या छापून घेऊन मुख्याधिकारी यांनी तयार केलेल्या आहेत. त्या याद्या संबंधित मतदारांचे माहितीसाठी दिनांक २१/०६/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत येऊन नागरीकांच्या माहितीसाठी पुढील ठिकाणी उपलब्ध करण्यांत आलेल्या आहेत.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड–अलिबाग २) उरण नगरपरिषद कार्यालय नोटीस बोर्डावर ३) तहसिल कार्यालय उरण जि. रायगड ४) उरण नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. ३ मोरा–उरण ५) उरण नगरपरिषदेच्या https://drive.google.com/drive/folders/1fwNzawnT3DRewyx1LOMCMIN3y6iA2uw2?usp=sharing या लिंक वर तसेच उरण नगरपरिषदेच्या http://uranmahaulb.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर वरील GOOGLE DRIVE लिंक उपलब्ध आहे.

त्याअर्थी सदरची मतदार यादी तयार करताना काही चुका राहिलेल्या असल्यास त्या दुरुस्त करण्या संदर्भात दिनांक २१/०६/२०२२ ते दिनांक २७/०६/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत संबंधितांकडून सूचना व हरकती मागविण्यात येत आहे. यासंदर्भात पुढील बाबी विचारांत घेतल्या जातील.

१) काही लेखनिकांच्या, टंकलिपीकांच्या किंवा संगणकीय मुद्रण दोष असल्यास,
२) एका प्रभागांतील नावे चुकून दुसऱ्या प्रभागामध्ये अंतर्भूत झाली असतील तर,
३) नगरपरिषदेच्या संबंधित प्रभागाच्या क्षेत्रांतील नांवे दिनांक ३१/०५/२०२२ रोजी अस्तित्वांत असलेल्या विधानसभा मतदार यादीत असूनही नगरपरिषदेच्या मतदार यादीमध्ये वगळली गेली असल्यास,

सबब, नागरीकांच्या वरील बाबत काही सूचना अगर हरकत असल्यास त्यांनी उक्त नमद केल्याप्रमाणे विहीत मुदतीमध्ये सादर कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या सूचना वा हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

**उरण नगरपरिषद कार्यालय**
**उरण, दिनांक २१/०६/२०२२**

**सही/–**
**(संतोष माळी)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**


# उरणमध्ये रिमझिम पाऊस; शेतकरी सुखावला

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात दडी मारलेल्या पावसाने सोमवारपासून (दि. २०) रिमझिम पडण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे पेरणी केलेल्या भाताच्या रोपांना हवेतील वातावरण व पावसाचे पाणी पोषक ठरणारे असल्याने शेतकरी सुखावला आहे.

यावर्षी मान्सूनपूर्व पावसाने जून महिन्याच्या सुरुवातीला हुलकावणी दिल्याने भातशेतीत पेरणी केलेले भातबियाणे वाया जाते की, काय अशी भीती शेतकऱ्यांना सतावत होती. त्यात उरण तालुक्यात रात्रीच्या सुमारास रिमझिम पावसाने सुरुवात केली. त्यामुळे हवेतील वातावरण व पावसाचे पाणी हे भात शेतीला पोषक ठरणारे झाले आहे. एकंदरीत पेरणी केलेल्या भाताच्या रोपांची जळत गतीने वाढ होणार असल्याने शेतकरी सुखावला आहे.



पावसाने रविवार व सोमवार या दिवसात रिमझिम का होईना सुरुवात केल्याने शेतकरी, विद्यार्थी व पालकांनी बाजारात जाऊन छत्री, प्लास्टिक ताडपत्री, खते, कीडनाशके खरेदी करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे व्यापारी वर्ग सुखावला आहे.

## दुखवटा

### तेजस चव्हाण

**सिंधुदुर्ग :** मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे सदस्य राजन चव्हाण यांचे चिरंजीव तेजस चव्हाण यांचे सोमवारी (दि. २०) सकाळी निधन झाले. ते ३२ वर्षांचे होते.



तेजस चव्हाण हे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळात सुपरवायझर म्हणून कार्यरत होते. सोमवारी कामावर रुजू झाल्यानंतर ते प्रसाधनगृहात गेले असता चक्कर येऊन कोसळले. त्यांचे डोके लोखंडी नळावर आपटल्यामुळे ते गंभीर जखमी झाले. प्रसाधनगृहाचा दरवाजा तोडून त्यांना बाहेर काढण्यात आले. जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत म्हणून घोषित केले. कै. तेजस चव्हाण यांच्या पश्चात पत्नी, आई–वडील तसेच बंधू–वहिनी असा मोठा परिवार आहे.

पान १ वरून


## पनवेल झोपडपट्टीमुक्त महापालिका होण्याचा मार्ग मोकळा

पनवेल महापालिका हद्दीत प्रधानमंत्री आवास योजनेसाठी या योजनेचा कृती आराखडा करून २०२२ परिणत त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. महापालिकेने आपल्या हद्दीतील सन २००० पूर्वीच्या १००५ झोपड्या व नंतरच्या ३५८६ झोपड्यांचे सर्वेक्षण केले आहे. त्याच्या आधारे आठ झोपडपट्ट्यांतील २०६२ रहिवाशांचे पुनर्वसन प्रस्तावित केले होते. त्याला केंद्र व राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. पहिल्या टप्प्याचे काम मनपा मालकीच्या भूखंडावर, तर दुसऱ्या टप्प्याचे काम शासनाने हस्तांतर केलेल्या भूखंडावर आहे. आता इंदिरा नगर झोपडपट्टी, अशोक बाग व तक्का वसाहत येथील झोपडपट्टीवासीयांसाठी तिसऱ्या टप्प्याचे काम आसूडगाव हद्दीत सर्वे क्रमांक ५३च्या भूखंडावर आहे. या प्रकल्पात एकूण १५२६ घरे असून त्यातील ६९६ घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल (ईडब्ल्यूएस) गटासाठी आणि ८४० घरे कमी उत्पन्न (एलआयजी) गटासाठी आहेत तसेच १९८ व्यावसायिक गाळ्यांचा प्रस्ताव आहे. यातील ६६६ ईडब्ल्यूएस घरे झोपडपट्टीवासीयांसाठी असून उर्वरित ३० घरे तसेच एलआयजी गटातील ८४० घरे व १९८ व्यावसायिक गाळे खुल्या विक्रीसाठी आहेत.

दिव्यांग विभागामार्फत घरोघर जाऊन दिव्यांगांचे सर्वेक्षण करण्यासाठी खासगी संस्थेची नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्ष घरी जाऊन दिव्यांगांची भेट घेतल्याने त्यांच्या अडचणी व समस्या समजून घेत त्यांना जास्तीत जास्त योजनांचा लाभ देता येईल व कोणी या योजनांपासून वंचित रहाणार नाही. पनवेल महापालिका हद्दीत सन २०२१–२२ अखेर १२१२ नोंदणीकृत दिव्यांग बांधव आहेत. नवीन सर्वे केल्यानंतर त्यात वाढ होऊ शकते. महापालिका हद्दीत एकूण लोकसंख्येच्या २.५ टक्के म्हणजेच अंदाजे २५ हजार दिव्यांग असण्याची शक्यता आहे. दिव्यांग सर्वेक्षणासाठी तीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असली तरी प्रत्यक्ष दिव्यांगांची संख्या व प्रत्यक्ष सर्वेक्षण यानुसारच रक्कम देण्यात येणार आहे.

महापालिका हद्दीतून जाणाऱ्या सायन–पनवेल महामार्गावर सीबीडी जंक्शन ते कळंबोली जंक्शन या भागातील रस्त्यावर कायम अंधार असतो. हा महामार्ग एमएमआरडीकडे आहे. तो महापालिका ताब्यात घेणार असून त्यासाठी सर्वसाधारण सभेत महामार्गावरील २६७ पथदिवे व ९१८ सोडियम पथदिवे यांची देखभाल व नवीन एलईडी बसवण्यासाठी १० कोटी चार लाख ७४ हजार ८८० रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. त्यामुळे आता हा महामार्ग उजळून तेथील अंधार दूर होणार आहे

पनवेल महापालिका प्रभाग 'ड'मधील प्रभाग क्रमांक १९मध्ये भूखंड क्रमांक १९३ येथे रोज बाजार विकसित करण्यात येणार आहे. या इमारतीत तळमजल्यावर ३०४ ओटे व पहिल्या मजल्यावर १०० ओटे व ७० गाळे प्रस्तावित करण्यात आले आहेत. याशियाय वाहनतळासाठी दोन मजले राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यासाठी सात कोटी ७६ लाख १२ हजार ६२६ रुपयांच्या तरतुदीला मंजुरी देण्यात आली.

**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**मंगळवार, दि. २१ जून २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## निवडक

### त्रिकुटाकडून एकाची फसवणूक

**पनवेल :** तीन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्याकडे असलेल्या पिवळ्या धातूंच्या मण्यांच्या माळा या सोन्याच्या आहेत, असे सांगून एका व्यक्तीची जवळपास चार लाख ३९ हजारांची फसवणूक केली आहे. ही घटना पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाहेर असलेल्या एनएमएमटी बसस्थानकाजवळ घडली आहे. राकेश पार्टे (वय ३६) यांना तिघांनी मिळून त्यांच्याकडे पिवळ्या धातूंच्या मण्यांच्या माळा या सोन्याच्या आहेत, असे सांगून त्याच्या बदल्यात तुम्ही रोख रक्कम द्या असे सांगितले. पार्टे यांनी त्या तिघांवर विश्वास ठेवत जवळपास चार लाख ३९ हजार रुपये त्यांना दिले. या बदल्यात त्यांना नकली सोन्याच्या माळा देण्यात आल्या. फसवणूक झाल्याचे पार्टे यांच्या लक्षात येताच त्यांनी या बाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दिली.

### ओवळा गावात घरफोडी

**पनवेल :** खालचा ओवळा गावातील एका घरात अज्ञात चोरट्याने केलेल्या घरफोडीत लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरी केल्याची घटना घडली आहे. विश्वनाथ म्हात्रे यांच्या राहत असलेल्या खालचा ओवळा या घराच्या गेटला व मेन दरवाजाला लावलेले लॉक कोणत्यातरी हत्याराने तोडून त्याद्वारे घरामध्ये प्रवेश करून घरात असलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मिळून जवळपास दोन लाख सात हजार रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. या बाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** मूळ गावी जातो असे सांगून घरा बाहेर पडलेला एक व्यक्ती अद्याप घरी न पोहचल्याने तो हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. संदेश धोंडीराम कांबळे (वय ३७, रा. बालाजी अपार्टमेंट, परदेशी आळी



पनवेल) असे त्या व्यक्तीचे नाव असून उंची पाच फूट, रंग सावळा, चेहरा गोल, बांधा मजबूत, केस बारीक, नाक बसके असून अंगात लाल शर्ट व निळसर पॅन्ट घातलेली आहे. सोबत मोबाइल फोन आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार संदीप फाळके यांच्याशी संपर्क साधावा.

### खानावळे येथून ऐवजाची चोरी

**पनवेल :** अल्युमिनियमच्या तारासह विद्युत केबलची अज्ञात चोरट्याने केली चोरी झाल्याची घटना तालुक्यातील खानावळे गावात घडली आहे. टेक्निक कंपनीच्या समोरील रोडच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत ठेवलेली २५ हजार रुपये किमतीची अल्युमिनियमची तार, तसेच १२ हजार रुपये किमतीची अंडर ग्राउंड वापराची विद्युत केबल, असा मिळून ३७ हजार रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. या बाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# उरणची वाटचाल दुसऱ्या आर्थिक राजधानीकडे

## वाढत्या उद्योगांमुळे परिसरात विकासाची गंगा



**उरण : जीवन केणी**

उरण परिसरात जेएनपीएसारखे अत्याधुनिक जागतिक दर्जाच्या बंदराची उभारणी झाली. बंदरातून प्रचंड प्रमाणात होणाऱ्या आयात-निर्यात व्यापारामुळे उरण परिसरात विकासाची गंगा वाहू लागली. जेएनपीए, ओएनजीसी, बीपीसीएल व इतर प्रकल्पांवर आधारित मोठ्या प्रमाणात सुरू झालेल्या उद्योगांमुळे वर्षाकाठी सुमारे ८० हजार कोटींपर्यंत आर्थिक उलाढाल वाढली आहे. वाढत्या उद्योगांमुळे उरणची वाटचाल दुसऱ्या आर्थिक राजधानीकडे होऊ लागली आहे. यात स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून आमदार महेश बालदी यांचे मोलाचे योगदान लाभत आहे.

भात आणि मीठाचे कोठार म्हणून असलेले उरणमध्ये आता प्रचंड गतीने औद्योगिकीकरण होत आहे. जेएनपीए आणि अन्य तीन खासगी बंदरातून वर्षाला ५० लाख कंटेनर मालाची आयात-निर्यात केली जाते. आता नव्याने देशातील सर्वांत मोठ्या आणि ५० लाख कंटेनर हाताळणी क्षमतेचे व आठ हजार कोटी खर्चाचे चौथे बंदर उभारण्यात आले आहे. या बंदराच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्याच्या कामाला सुरुवात झाली आहे.

करंजा कंटेनर बंदरही सुरू झाले आहे. करंजा-रेवस मार्गावर रो-रो सेवा सुरू होणार आहे. जागतिक एलिफंटा बेटावरही २४ तास वीज उपलब्ध झाली आहे. यामुळे पर्यायाने पर्यटन उद्योगाला चालना मिळाली आहे.

**अत्याधुनिक मच्छीमार बंदर**

राज्यातील सर्वांत मोठे एक हजार बोटी क्षमतेचे करंजा येथे १५० कोटी खर्चून अत्याधुनिक मच्छीमार बंदर उभारण्यात आले आहे. या बंदरामुळे सुमारे २५ हजार रोजगार उपलब्ध होण्याची घोषणा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या बंदरामुळे हजारो मच्छीमारांच्या आर्थिक उन्नतीच्या मार्गाला मोठा हातभार लागणार आहे.

**रस्ते रुंदीकरण प्रगतिपथावर**

जेएनपीएने तीन हजार कोटीची सहा आणि आठ पदरी रस्ते रुंदीकरणाची कामे प्रगतिपथावर आहेत. त्यामध्ये सात फ्लायओव्हरचाही समावेश आहे. मोठ्या क्षमतेची जहाजे लागण्यासाठी समुद्र चॅनेलची खोली १५.८० मीटरपर्यंत वाढविण्यात आली आहे. नुकतेच या बंदरात १३ हजार कंटेनर भरलेले मालवाहू जहाज दाखल झाले होते.

**उरण रेल्वेमार्गाचे काम सुरू**

सिडको आणि रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात येत असलेला नेरूळ-उरण रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. हा रेल्वे मार्ग खारकोपर या पहिल्या टप्प्यापर्यंत कार्यान्वीत झाला आहे. उरणपर्यंत हा रेल्वेमार्ग येत्या सप्टेंबर २०२२ पुर्णत्वास जाईल, अशी घोषणा मध्यरेल्वेचे महाव्यवस्थापक अनिल कुमार लाहोटी यांनी केली आहे.

**प्रकल्पांमुळे जमिनीला भाव**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, शिवडी-न्हावा सीलिंक पूल, विरार-अलिबाग कॉरिडॉर यामुळे प्रकल्पांमुळे उरण परिसरातील जमिनीला सोन्याचा भाव आला आहे.

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून कळंबोली येथील कामांची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात मान्सूनपूर्वीची कामे युद्धपातळीवर सुरू असून यातील अनेक कामे पूर्णत्वास आली आहेत. त्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी (दि. २०) कळंबोली परिसरामधील नालेसफाईच्या कामांची पाहणी केली. ज्या ठिकाणी अजूनही कामे सुरू आहेत ती लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी संबधित विभागाला दिले.





पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली सेक्टर १३, ८, १०, १ ई यासह आजूबाजूच्या परिसरामध्ये पावसाळ्यापूर्वीची कामे वेगाने सुरू आहेत. या कामांची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अधिकाऱ्यांसह पाहणी करून ती कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

या पाहणीच्या वेळी पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती 'ब'च्या सभापती प्रमिला पाटील, नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, राजेंद्र शर्मा, नगरसेविका मोनिका महानवर, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, सरचिटणीस दिलीप बिस्ट, यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

## पनवेलच्या ठाणा नाका येथे मोटरसायकलचा अपघात

### एकाचा मृत्यू; चालक गंभीर जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पळस्पे येथून कळंबोलीच्या दिशेन जाणाऱ्या मोटरसायकलवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने मोटरसायकल रस्त्याच्या बाजुला झुडूपात जाऊन पडली. या झालेल्या अपघातात मोटरसायकलवर पाठीमागे बसलेल्या व्यक्तीचा मृत्यू, तर मोटरसायकलचालक गंभीर जखमी झाल्याची घटना पनवेलमधील ठाणा नाका येथे घडली. या अपघातातील जखमी मोटरसायकल चालकावर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहे.

अपघातामधील मृत व्यक्तीचे नाव संदीप मधुकर पारंगे (वय ३५) तर जखमी झालेल्या मोटरसायकल चालकाचे नाव क्षितीज धोडगे (वय ३४) असे आहे. संदीप आणि क्षितीज दोघे मित्र असून ते पनवेल तालुक्यातील गिरवले गाव येथे राहण्यास होते. संदीप पारंगे पळस्पे येथील जेडब्ल्यूसी वेअरहाऊसमध्ये कामाला होता. संदीप सेकंड शिफ्टला गेला होता. रात्री कामावरून सुटल्यानंतर क्षितीजच्या एव्हेंजर मोटारसायकलवरुन संदीप आणि क्षितीज दोघे मध्यरात्री १२.३० वाजता कळंबोलीच्या दिशेने निघाले होते. या वेळी पनवेल येथील ठाणा नाका येथील वळणावर क्षितीजचे मोटरसायकलवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे त्याची मोटरसायकल रस्त्याच्या बाजुला असलेल्या झुडूपात जाऊन पडली.

या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाल्याने बेशुध्द होऊन तेथेच पडले. सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास क्षितीज शुध्दीवर आल्यानंतर त्याने पोलिसांना अपघाताची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी दोघांना एमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल केले. त्याठिकाणी उपचार सुरू असताना, सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास संदीपचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या अपघाताची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



पनवेल : भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे कळंबोली येथे आल्या होत्या. या वेळी त्यांचे भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे व कळंबोली मंडल चिटणीस बायजा बारगजे यांनी स्वागत केले.

## गव्हाण विद्यालयाच्या सुनील गावंड यांना मुख्याध्यापकपदी बढती

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजचे उपशिक्षक सुनील गावंड यांची बढतीने संस्थेच्या दक्षिण विभागातील म्हाप्रळ, (ता. मंडणगड, जि. रत्नागिरी) येथे मुख्याध्यापकपदी बढती झाली आहे. याबद्दल त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. या वेळी लोकनेते



रामशेठ ठाकूर यांनी गावंड यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गव्हाण विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंतशेठ ठाकूर व अशोक कडू हे मान्यवर उपस्थित होते.

सुनील गावंड उर्फ एस. आर. गावंड मराठी विषयाचे व्यासंगी अध्यापक म्हणून प्रख्यात असून अत्यंत मनमिळावू अणि अभ्यासू शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांमध्ये परिचित आहेत. अध्यापनाबरोबरच संगीत कलेमध्ये पारंगत असणाऱ्या गावंड यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून संगीत क्षेत्रातही योगदान दिले आहे.

या वेळी सुनील गावंड यांनी त्यांना विशेष मार्गदर्शन करणारे गव्हाण विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे सदस्य अनंताशेठ ठाकूर, प्राचार्या साधना डोईफोडे व रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांच्या विशेष सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



खारघर : सेक्टर २० येथील शहीद योगेश पेट्रोल पंपासमोर एमटीएनएल केबलची ड्रेनेज कव्हर तुटल्याने दूरवस्था झाली होती. त्यात पडून अनेकांच्या गाड्यांचे नुकसान झाले होते. या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी सिडकोचे कार्यकारी अभियंता श्री. रघुवंशी यांना तत्काळ कार्यवाही करण्याची सूचना केली. त्यानुसार ही समस्या मार्गी लावत सिडकोने केबल ड्रेनेजचे काम सुरू केले आहे.

## पी. पी. खारपाटील स्कूलचे दहावीच्या परीक्षेत सुयश

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

चिरनेर येथील के. ई. एस इंग्लिश मिडियमच्या ठकूबाई खारपाटील स्कूलचा निकाल १०० टक्के इतका लागला असून परीक्षेला बसलेले २५ पैकी २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.

शाळेत दहावी परीक्षेत चिन्मय गणेश गव्हाणकर ८९.८० टक्के गुण मिळवून शाळेत सर्वप्रथम आला, तर वरद प्रमोद पाटील ८६.६० टक्के गुण मिळवून शाळेत दुसरा आला, तसेच श्रावणी प्रशांत पाटील ८६.२० टक्के गुण मिळवून शाळेत तिसरी आली आहे. प्रणव रमेश केणी ८३.८० टक्के गुण मिळवून चौथा आला तर आकांशा अभिमन्यू पाटील ८३ टक्के गुण मिळवून शाळेत पाचवी आली आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष पी. पी. खारपाटील उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, प्रशासकीय अधिकारी आर्यन पाटील, मुख्याध्यापिका सुप्रिया हेमंत म्हात्रे आदींनी अभिनंदन केले आहे.

### चिरनेर शाळेचा निकाल ९७.७५ टक्के

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

येथील परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक दहावी परीक्षेचा निकाल ९७.७५ टक्के लागला आहे. यामध्ये रिया विजय म्हात्रे ९०.८० टक्के गुण मिळवून शाळेत पहिली आली, तर विनिता शेखर वशेणीकर ८८.६० टक्के गुण मिळवून शाळेत दुसरी आली. आरती हनुमंत पाटिल ८४.६० टक्के गुण मिळवून शाळेत तिसरी आली, तर आज्ञा जगदिश पाटील ८३.४० टक्के गुण मिळवून चौथी आली, तर कक्षा रमेश म्हात्रे ८२.४० टक्के गुण मिळवून पाचवी आली.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष पी. पी. खारपाटील उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, मुख्याध्यापक सुरदास राहुत, मदन मोकळ, अशोक पाटील या सर्वांनी अभिनंदन केले आहे.

## पनवेलमध्ये चौकडीकडून एकास मारहाण

**पनवेल :** चार अनोळखी व्यक्तींनी किरकोळ कारणावरून मोटरसायकलस्वारास जबरी मारहाण केल्याची घटना ओरियन मॉलसमोरील सर्व्हिस रोडवर घडली आहे. राहुल चव्हाण (वय ३३) हे त्यांचा मित्र अविनाश कांबळे यांच्यासह त्यांच्या मोटरसायकलीवरून घरी जात होते. या वेळी ओरियन मॉलसमोरील सर्व्हिस रोडवर चौघे जण चार चाकी वाहनातून विरुद्ध दिशेने जात असल्याने तुम्ही चुकीच्या का जात आहेत असे बोलले असता त्यांच्यात वादावाद झाली. यामध्ये चार अनोळखी व्यक्तींनी राहुल व अविनाश यांना शिवीगाळ करून राहुल यांना त्यांच्याकडे असलेल्या रॉड, बेल्ट व काचेची बॉटलने मारहाण करून त्यांना जखमी केल्याने या बाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



पनवेल : तालुका पत्रकार विकास मंचचे खजिनदार आणि मल्हार टीव्हीचे संपादक नितीन फडकर यांच्या वाढदिवसानिमित्त रसायनी, कष्टकरीनगर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना सोमवारी छत्र्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी मंचचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, सदस्य प्रवीण मोहोकर, सुनील राठोड यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २४

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. भारतात सध्या एलआयसीसह एकूण किती जीवन विमा कंपन्या आहेत?**

**अ.** २४ **आ.** २०
**इ.** १० **ई.** २६

**२. म्युच्युअल फंडाचे व्यवस्थापन भारतात सध्या किती कंपन्या करतात?**

**अ.** ४० **आ.** ४४
**इ.** २० **ई.** १०

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**

**अ.** एचडीएफसी बँक **आ.** आयसीआयसीआय बँक
**इ.** कोटक महिंद्रा बँक **ई.** स्टेट बँक ऑफ इंडिया




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# चांगल्या कामास कोलदांडा

अग्निपथ योजना सरकारने मागे घ्यावी असे टुमणे काही विरोधीपक्षांनी लावले होते. परंतु ही महत्त्वाकांक्षी योजना ठरल्याप्रमाणेच सुरू होईल. त्यामध्ये आता कुठलाही बदल करण्यात येणार नाही असे लष्कराच्या तिन्ही दलांच्या प्रमुखांनी एकत्रित पत्रकार परिषद घेऊन सांगितले ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. एकंदरीत एका चांगल्या योजनेचे मातेरे करण्यासाठी काँग्रेस आणि अन्य पक्षांनी कंबर कसली आहे तर केंद्र सरकार आणि लष्कराने या विरोधाला न जुमानता पुढे जायचे ठरवल्याचे चित्र दिसते आहे.

**कोणाचे भले होत असेल तर एखाद्याच्या पोटात दुखते. सत्ता गेल्यापासून काँग्रेस पक्षाला तर पोटदुखीचा विकारच जडला आहे असे वाटते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपप्रणित सरकारने गेल्या आठ वर्षांत अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. त्या निर्णयाचे फलित म्हणूनच आज नवा भारत उदयाला आलेला दिसतो आहे. परंतु सत्तेपासून दूर फेकल्या गेलेल्या काँग्रेससारख्या विरोधीपक्षांना त्यामुळेच पोटदुखी जडली आहे. केंद्र सरकारने नुकतीच 'अग्निपथ' ही लष्करभरती योजना जाहीर केली. वास्तविक ही योजना अतिशय भविष्यवेधी आहे. या योजनेमुळे भारतातील तरुण पिढीला राष्ट्रकार्यात थेट सहभागी होता येईल. त्याशिवाय स्वत:ची कारकीर्द देखील घडवता येईल. परंतु या योजनेबद्दल लोकांमध्ये गैरसमज पसरवण्यात विरोधकांना अंशत: का होईना यश आले असे म्हणावे लागेल. त्याचीच परिणीती म्हणून काही राज्यांमध्ये जाळपोळीच्या आणि तोडफोडीच्या घटना घडल्या. परंतु लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संपूर्ण अभ्यासाअंती अग्निपथ ही योजना जनतेसमोर आणली आहे. या योजनेतील सहभाग पूर्णत: ऐच्छिक आहे. तरीही बहकलेल्या तरुणांनी अत्यंत चुकीच्या मार्गाने आपला विरोध दर्शवला. परंतु, योजना तर बंद होणार नाहीच, उलट निदर्शने, जाळपोळ किंवा तोडफोडीमध्ये सहभागी झालेल्यांना या योजनेत स्थान मिळणार नाही असे लष्करातर्फे आता स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अग्निपथ योजनेत भाग घेण्यासाठी निदर्शने, जाळपोळीच्या कृत्यांमध्ये आपण सहभागी झालो नसल्याचे हमीपत्र आता उमेदवारांना लिहून द्यावे लागणार आहे. ही अट केवळ या योजनेचे राजकारण करणाऱ्या पक्षांमुळे लादावी लागली आहे हे उघड आहे. ठरल्याप्रमाणे लष्करामध्ये २५ हजार जवानांची पहिली तुकडी डिसेंबरमध्ये सहभागी होईल. या जवानांच्या निवडीसाठी देशभरात भरती मेळावे घेतले जातील. चार वर्षांच्या कारकीर्दीनंतर सशस्त्र दलातून अग्निवीर बाहेर पडतील. नौदल आणि हवाई दलाचा भरती कार्यक्रमही लवकरच सुरू होणार आहे. काही राज्यांमध्ये हिंसाचाराच्या घटना घडल्या असल्या तरी महाराष्ट्रात मात्र शांतता आहे. तथापि, जनता शांत असली तरी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मात्र अग्निपथ योजनेवर तोंडसुख घेतले. या योजनेची संपूर्ण माहिती घेऊन त्यांनी भाष्य करायला हवे होते. हा विषय राजकारणाचा नाही याचे भान सर्वच विरोधीपक्षांनी ठेवणे आवश्यक आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आज हयात असते तर या योजनेचे त्यांनी निश्चितच स्वागत केले असते. काही विषय राजकारणाच्या परिघाबाहेरचे असतात. देशाचे संरक्षण आणि सर्वंकष विकास याबाबतीत राजकारणाचा खेळ होता कामा नये. चांगल्या कामात कोलदांडा घालणे म्हणजे राजकारण असे नव्हे. या वृत्तीमुळे देशाची म्हणजे आपल्या सर्वांची प्रगती खुंटते याचे भान सर्वच पक्षांनी ठेवायला हवे आहे.**

# महाडमध्ये नैसर्गिक आपत्ती यंत्रणा अद्यापही सज्ज नाही!

पावसाळा सुरू झाला की महाडकरांमध्ये नैसर्गिक संकटाने धास्ती भरते. मागील महापुरांची पुनरावृत्ती होणार की काय याबाबत लोकांमध्ये सतत चर्चा आहे, मात्र या कामी प्रशासनाची कोणतीच यंत्रणा सज्ज नसल्याचे आजतरी दिसत आहे.

नैसर्गिक आपत्ती २००५ला महाडमध्ये जवळपास १४ गावांवर दरडी कोसळल्या होत्या. यामध्ये शेकडो नागरीक आणि हजारो जनावरे दगावली होती. दरडी सोबत महापुरानेदेखील थैमान मांडले होते. तेव्हापासून महाड हे नैसर्गिक आपत्तीचे ठिकाण बनले होते आणि तेव्हापासून महाडसाठी एनडीआरएफ किंवा स्थानिकांची प्रशिक्षित यंत्रणा या काळात कायमस्वरूपी तैनात असावी अशी मागणी होत होती. मात्र त्यानंतर अनेक नैसर्गिक आपत्ती येऊनही महाडसाठी अशी कोणतीच यंत्रणा सज्ज झालेली नाही.

गेल्या दोन दशकांच्या काळात महाड तालुक्यात २००५मध्ये महापूर आणि दरडी कोसळलेल्या, कोकण रेल्वेचा अपघात, सावित्री पूल दुर्घटना, तारीक गार्डन इमारत दुर्घटना, २०१९ आणि २०२१ चा महापूर, अशा अनेक घटनांनी महाड हादरून गेले होते. तसेच महाड ज्या प्रमाणे नैसर्गिक संवेदनशील आहे, तसेच ते सामाजिक आणि ऐतिहासिक बाबतीतदेखील संवेदनशील आहे.



(संग्रहित छायाचित्र)

***मान्सून सक्रिय झाला असून निम्मा जून महिना कोरडा गेला आहे. त्यामुळे ही सरासरी जुलै महिन्यात भरुन निघण्याची शक्यता आहे. जुलै महिन्यात जर अतिवृष्टी झाली तर पुन्हा महापूर आणि पुन्हा महाडकरांसमोर समस्येचा डोंगर उभा राहणार आहे. यासाठी जी तयारी हवी होती, ती झालेलीच नाही. नगरपालिकेची सूचना आणि एक बोट हाच काय तो महाडकरांसाठी आधार आहे. याच्याच जिवावर महाडकरांचे अस्तित्व आहे. या गेल्या वर्षात हजारो कोटींचा विकास निधी नको त्या कामांना वापरला गेला असेल मात्र एकही रुपया बचाव साहित्यासाठी खर्च झालेला नाही. यात कोणाला पैसे खायला मिळत नाहीत. मात्र आपत्ती येऊन गेल्या नंतर निवारणासाठी शेकडो कोटी रुपयांचा चुराडा होतो व त्यातील अर्धे अधिक पैसे दुसरीकडेच जातात.***

महाडमधून अनेक आंदोलने महाराष्ट्रभर पोहचविली जातात. दरवर्षी चवदार तळे आणि किल्ले रायगड येथे लाखो अनुयायी येत असतात. महाडमध्ये नैसर्गिक आपत्तीना तोंड देण्यासाठी स्थानिक पातळीवर तरुणांनी पुढे यायला हवे. तशी सुरुवातदेखील झाली आहे. प्रशांत साळूंखे या होतकरु तरुणाने अनेक तरुणांना एकत्र करुन साळूंखे रेस्कू टिम तयार केली आहे. या टिमच्या माध्यमातून त्यांनी अनेक बचाव कार्य व शोधमोहीम यशस्वी





राबविल्या आहेत. शासनाकडून कोणते अनुदान मिळेल याची अपेक्षा न करता त्यांचे काम सुरू आहे. महाडकरांनी आता शासनाच्या बचाव यंत्रणेची वाट न पाहता स्वतः ची व्यवस्था तयार केली पाहिजे.

मोठा गाजावाजा करीत रायगडच्या पालकमंत्र्यांनी एनडीएआरएफ चा कायमस्वरुपाचा तळ महाड मध्ये उभारणार अशी घोषणा केली, त्यासाठी शासकीय दुध डेरीची जागा देखील निश्चित झाली. मात्र महाडमध्ये दुसरी नैसर्गिक आपत्ती येण्याची वेळ आली तरी एनडीआरएफचा साधा रुमाल देखील महाडकरांना दिसलेला नाही. नागरीक आणि जनावरांना पुरातून वाचविण्यासाठी पॉवर बोट नाही की, बाधीत ग्रामपंचायतींना साधी दोरीदेखील देण्यात आलेली नाही. रेस्कू करण्यासाठी गेले एक वर्षे हेलीपॅडसाठी जागा शोधली जात आहे, मात्र महसूल विभागाला शहरालगत पूररेषेच्यावर साधी एक एकर जागा देखील मिळू शकलेली नाही. आपतकालीन प्रशिक्षणाच्या नावाखाली फक्त इव्हेंट करण्यात आले. २२ जुलै २०२१च्या महापूरात बिरवाडी, एमआयडीसी, आसनपोई, नांगलवाडी, कांबळे, राजेवाडी, वडवली, कोल, कोंडीवते, चाचिंदे, सव, गोठे, महाड शहर, करंजखोल, मोहोप्रे, पाले, लाडवली, आचळोली, गोंडाळे, तेटघर, कोळोसे या गावांना महापुराचा मोठा फटका बसला होता. या गावांतून चार्जिंग लाईट, बॅटरी, रस्सी, महत्वाच्या गरजेच्या वस्तू, धान्याचा साठा, एअर बोट आणि बचाव साहित्य हे या प्रत्येक ग्रामपंचायतीना देणे गरजेच होते. मात्र सावित्री नदीमधील गाळ काढण्याला शासनाने प्राधान्य दिल्यामुळे या गोष्टींकडे दुर्लक्ष झाले आहे. या साठी केवळ शासन जबाबदार नसून स्थानिक लोकप्रतिनिधी देखील तितकेच जबाबदार आहेत. महाड नागरिकांनी मिळून पूरनिवारण समितीची स्थापना केली, मात्र ही समिती देखील सावित्रीच्या गाळात अडकून पडली. पूरनिवारणावर तत्काळ कोणताही उपाय नाही. अशावेळी या आपत्ती विरोधात लढता कसे येईल याचा विचार या समितीने करणे गरजेचे होते. मात्र या पूरनिवारण उपाययोजने पेक्षा श्रेय घेण्याचीच चढाओढ जास्त लागली होती.

दरम्यान, पावसाळा सुरु झाला आणि महाडकरांसमोर गेल्यावर्षीचे चित्र पुन्हा एकदा डोळ्यासमोर येऊ लागले आहे. सलगच्या दोन वर्षे येत असल्याने संकटाने काहीच बोध प्रशासनाने घेतल्याचे दिसून येत नाही. अनेक नैसर्गिक आपत्ती येऊनही महाडसाठी अशी कोणतीच यंत्रणा सज्ज झालेली नाही.

**खबरबात**
**महेश शिंदे**

## बदलते तंत्रज्ञान

### असा परत मिळवा पासवर्ड

अनेक वेळा लोक पासवर्ड विसरतात. बाकीच्या ॲप किंवा अकाउंटवर पासवर्ड सहज रिसेट होतो, पण जीमेलमध्ये तसे होत नाही. बाकीच्या ॲप किंवा अकाउंटवर पासवर्ड सहज रिसेट होतो, पण जीमेलमध्ये तसे होत नाही.

दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तंत्रज्ञानामुळे आता प्रत्येक कामासाठी लोक ऑनलाइन गोष्टींवर अवलंबून राहू लागले आहेत. अशा परिस्थितीत वेगवेगळ्या कामांसाठी स्वतंत्र अकाउंट्स तयार करावे लागतात. येथूनच खरी समस्या सुरू होते. वास्तविक, इतके पासवर्ड लक्षात ठेवणे शक्य नाही. अनेक वेळा लोक पासवर्ड विसरतात. बाकीच्या ॲप किंवा अकाउंटवर पासवर्ड सहज रिसेट होतो, पण जिमेलमध्ये तसे होत नाही.

गोपनीयतेमुळे आणि सुरक्षिततेमुळे, जीमेलमधील पासवर्ड पुनर्प्राप्ती प्रक्रिया खूप मजबूत आहे. अशा परिस्थितीत, अनेक वेळा लोकांना हवे असतानाही पासवर्ड रिकव्हर करता येत नाही. यामुळेच त्यांना त्यांचे ईमेल वापरता येत नाही. आज आपण अशा काही ट्रिक्स जाणून घेणार आहोत ज्याद्वारे तुम्ही ईमेल आयडी आणि फोन नंबरशिवायही तुमचे अकाउंट रिकव्हर करू शकता.

तुम्ही जीमेल अकाउंट तयार करता तेव्हा गुगल तुम्हाला रिकव्हरी ईमेल आयडी आणि फोन नंबर विचारते. अकाउंट तयार करताना दोन्ही माहिती देणे फायदेशीर आहे. याच्या मदतीने तुम्ही तुमचे अकाउंट कोणत्याही गुंतागुंतीशिवाय रिकव्हर करू शकता, परंतु जर तुम्ही चुकून ते करू शकत नसाल तर तुम्हाला थोड्या मोठ्या प्रक्रियेतून जावे लागेल. येथे आम्ही ती प्रक्रिया सांगत आहोत ज्याद्वारे तुम्ही तुमचा जीमेलचा विसरलेला पासवर्ड बदलू शकता आणि तो पुनर्प्राप्त करू शकता. हे करण्यासाठी या दिलेल्या स्टेप्स फॉलो करा. प्रथम जिमेल लॉगिन पेजवर जा. येथे फरगोट पासवर्ड वर क्लिक करा. तुमच्याकडे बॅकअप जिमेल आणि फोन नंबर नसल्याने तुम्हाला दुसरी पद्धत अवलंबावी लागेल. येथे तुम्हाला तुमचा शेवटचा पासवर्ड टाकण्यास सांगितले जाईल.

तुम्हाला मागील पासवर्ड आठवत असल्यास, तो प्रविष्ट करा. जर ते लक्षात नसेल, तर तुम्हाला ट्राय अदर वे वर दोनदा क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्हाला आय डोन्ट हॅव माय फोन नंबर वर क्लिक करावे लागेल. आता येणाऱ्या पेजवर तुम्हाला एक मेसेज दिसेल, ज्यामध्ये तुम्हाला काही प्रश्नांची उत्तरे देण्यासंदर्भात माहिती द्यावी लागेल. आता ट्राय अगेन वर क्लिक करून पुढे जा. त्यानंतर काही सुरक्षा प्रश्नांची उत्तरे देऊन पुढे जा.

# निरायम आयुष्य अन् योगसाधना

आजच्या संगणकीय, स्पर्धेच्या, आधुनिक युगात प्रत्येक व्यक्ती पैशासाठी, कारकीर्द घडविण्यासाठी घड्याळ्याच्या काट्यावर धावत आहे. त्यामुळे त्याची शारिरिक व मानसिक अवस्था शोचनीय झाली आहे. भौतिक सुखाच्या मागे धावत त्याचे शरीर असंख्य रोगांचे केंद्रस्थान बनले आहे. या स्थितीत अनेकांना आरोग्याचे महत्त्व पटू लागले आहे. व्यायामशाळेत जाण्याबरोबरच आता अनेक लोक योगसाधनेकडे वळत आहेत. देश-विदेशातील तरुणात योगसाधनेची क्रेझ वाढली आहे. भारतातही योगाभ्यास करण्याची संख्या वाढत आहे.

भारतात योगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पतंजली मुनींच्या काळापासून योगा भारतात रुजत आहे. स्वामी विवेकानंदांनी भारतात तसेच जगभर योगाचा प्रसार केला. आज भारतात स्वामी रामदेव बाबा आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री श्री रविशंकर यांच्या माध्यमातून योगाचा प्रसार होत आहे. योगासनाचे फायदे त्यांचे मानवी मन व शरीरावर होणारे परिणाम याचे विस्तृत विवेचन करण्यात आले. काही देशांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून हा प्रस्ताव मान्यतेसाठी महासभेपुढे ठेवण्यात आला. संयुक्त राष्ट्राच्या १९३ देशांपैकी १७५ देशांचे सह प्रतिनिधी लाभले. प्रथमच एखाद्या प्रस्तावाला एवढ्या देशांचे प्रतिनिधी लाभले. विशेष म्हणजे संयुक्त राष्ट्रातील सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले चीन, फ्रान्स, रशिया, इंग्लंड आणि अमेरिका हे देश या प्रस्तावाचे सह प्रतिनिधी आहेत. या प्रस्तावावर सदस्य राष्ट्रांच्या सह्या झाल्यावर २१ जून हा दिवस जागतिक योग दिवस म्हणून घोषित करण्यात आला. २१ जून हा दिवस जगभरातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्त्व आहे म्हणून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा प्रस्ताव मांडण्यात आला. योग ही कोणत्याही धर्माची परंपरा व अभ्यास नसून ती वैज्ञानिक पंथनिरपेक्ष व सर्वंकष जीवनपद्धती आहे. रुग्णांसाठी ही एक चिकित्सा पद्धत तर योगीनसाठी साधना पद्धत, मुक्तीचा मार्ग व जीवनात पूर्णता आणण्याचे हे साधन आहे.





**निमित्त**

योगा हा शब्द युज या संस्कृत शब्दावरून घेतलेला आहे. आत्म्याचे परमात्म्यात विलीन होणे म्हणजेच योग. योगाचा मूळ सिद्धांत ध्यान आणि आसनाच्या माध्यमातून दैहिक आणि मानसिक पूर्णता प्राप्त करणे होय. याचे प्रारंभिक स्वरूप हिंदू ग्रंथांमध्ये महाभारत, उपनिषद, पतंजलीचे योगसूत्र आणि हटयोग, प्रदिपिकामध्ये मिळतात. आपले मन व आरोग्य स्वास्थ ठेवण्यासाठी योग करावा. योग हा शरीरातील सर्व अवयवांना निरोगी आणि तंदुरुस्त ठेवतो. योगामुळे मानवी शरीर लवचिक बनते आणि प्रत्येक कार्य करण्यासाठी सुलभता येते. योगा निव्वळ व्यायाम न मानता त्याचा स्वीकार काही वर्ष जीवन शैली म्हणूनच केला पहिजे.

योगाचे सर्वात महत्त्वाचे फायदे वजनात घट, सशक्त आणि लवचिक शरीर, तजेलदार त्वचा, शांत आणि प्रसन्न मन उत्तम आरोग्य यातली जी गोष्ट तुम्हाला हवी असते ती द्यायला योगा समर्थ आहे. सूर्यनमस्कार, कपालभारती आणि प्राणायाम या क्रियांनी वजन कमी होते. योगाच्या सहाय्याने वजन कमी करता येते, ताण तणावापासून मुक्ती होते, रोज आपल्या मनात आणि शरीरात साठवून राहणाऱ्या ताणतणावाचा निचरा करायचा असेल तर त्यासाठी योगाचा काही मिनिटाचा रोज केलेला सराव पुरेसा असतो. शांतीची अनुभूती घेण्यासाठी रोजच्या धकाधकीच्या कार्यक्रमातून थोडा वेळ काढायला हवा. रोज योग आणि ध्यान केल्याने अस्वस्थ झालेल्या मनाला काबूत आणण्यासाठी योगासारखा दुसरा उपाय नाही. शरीराचे संपूर्ण संतुलन योगामुळे होते. योगामध्ये सुप्त ज्ञान शक्ती व अन्य दिव्य शक्ती जाग्या होतात. योगामुळे अशुभ व अज्ञान दुर होते.

योग हे मनुष्याच्या बाह्य व आंतरिक विकास घडवून आणण्याचे सर्वांगीण साधन व माध्यम आहे. रोगमुक्त, तणावमुक्त, व्यसनमुक्त राहण्यासाठी आणि आयुष्यात सुख, समृद्धी व शांतता आणण्यासाठी सकाळी व संध्याकाळी एक तास योगासाठी देणे आवश्यक आहे. तर ते जे करतात त्यांच्या जीवनात प्राधान्य आपोआपच पूर्ण होऊ लागतात. योग म्हणजे मानसिक व शारिरिक स्वास्थ्य सांभाळण्याची एक बहुगुणी आणि प्राचीन पद्धत. आजकालच्या धकाधकीच्या आयुष्यात थोडा वेळ तरी योगासाठी देणे आवश्यक आहे. ताणतणावांवर मात करणे, फिटनेस राखणे यासाठी नित्य योगासने करणे फायदेशीर ठरते.

**-एच. एन. पाटील (उपशिक्षक)**
**तु. ह. वाजेकर विद्यालय, फुंडे**



## आरोग्य प्रहर



### हृदयविकाराची लक्षणे वेळीच घ्या जाणून!

हृदय शरिराच्या वेगवेगळ्या भागांना रक्त पुरवठा करते. हृदयाला प्राणवायुयुक्त रक्तपुरवठा करणाऱ्या शुध्द रक्तवाहिन्यांना हृदयधमन्या असे म्हणतात. जर अशा धमन्यांमध्ये अडथळे येऊ लागले तर हृदयाला रक्त मिळत नाही व त्रास सुरु होतो. यालाच हृदयविकार म्हणतात. हृदयविकारात धोक्याची पातळी हृदयाच्या स्नायुंना किती दुखापत झाली आहे यावर अवलंबून असते. मृत स्नायुंमूळे हृदयाला होणाऱ्या रक्त पुरवठ्याचा वेग कमी होतो व त्यामुळे पाऊलांना घाम फुटून श्वसनास त्रास होतो.

सहसा पुरूषांना हृदयविकाराचा झटका जास्त येत असतो. पुरुषांना हृदयविकाराचा झटका हा तीन टर्ममध्ये येत असतो. मात्र महिलांच्या बाबतीत तसे नसते. महिलांचा शक्यतो पहिल्याच झटक्यात मृत्यू होतो. त्यामुळे पुरूषांपेक्षा महिलांना हृदयविकाराचा जास्त धोका असतो. यामुळे काळजी घेणे तेवढेचं महत्त्वाचे आहे.

अलीकडे पुरूषांबरोबरीने महिलांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. हृदयातील रक्तभिसरणात बिघाडी झाल्याने हृदयविकाराचा झटका येतो. महिलांना जेव्हा हृदयविकाराचा झटका येतो तेव्हा त्याची लक्षणे महिलांना एका महिन्याआधीच दिसू लागतात. ही लक्षणे नेमकी कोणती, याविषयी आपण जाणून घेणार आहोत.

**लक्षणे या प्रमाणे आहेत**-महिलांना हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी महिन्याभरापुर्वीपासून शरीर थरथरायला सुरुवात करते. त्यामुळे महिलांना श्वास घेण्यास अडथळा निर्माण होतो. हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी काही दिवस महिलांना झोप येत नाही. महिन्याभरापुर्वी महिलांना पोटदुखीची समस्या जाणवते. हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी महिलांना तीव्र डोकेदुखी किंवा अस्वस्थता जाणवते. महिलांना जेव्हा वारंवार शकवा जाणवतो, तेव्हा समजून जायचे की हे हृदयविकाराचे लक्षण आहे. हृदयविकाराच्या झटका येण्यापुर्वी छातीच्या डाव्या बाजूला दुखणे, ताणणे जाणवते. हृदयाचे ठोके जास्त असामान्य वाटत असेल तर हे हृदयविकाराच्या झटक्याचे लक्षण असू शकते. मात्र या विषयीची माहिती डॉक्टरांकडूनच मिळू शकते.

# पेज नदीचे पाणी वाढल्याने आठ तरुण अडकले

## स्थानिकांनी दोरखंडाच्या सहाय्याने सर्वांना वाचविले; कर्जत वैजनाथ येथील घटना

**कर्जत : बातमीदार**

पेज नदीच्या पाण्यात अडकलेल्या आठ पर्यटकांना रविवारी (दि. १९) वैजनाथ (ता. कर्जत) येथील ग्रामस्थांनी प्रसंगावधान दाखवून दोरखंडाच्या सहाय्याने नदी बाहेर काढले आणि त्या सर्वांचे प्राण वाचविले.

कर्जत शहरातील आपल्या नातेवाईकांकडे रत्नागिरी येथील पाहुणे आले होते. रविवार ते सर्वजण वनभोजनासाठी वैजनाथ येथे गेले होते. तेथील पेज नदीच्या बंधाऱ्यावर ते जेवणाचा आनंद घेत होते. त्या वेळी अचानक पेज नदीचे पाणी वाढू लागले आणि पाहता पाहता ते सर्व ज्या ठिकाणी बसले होते, त्या बंधाऱ्याच्या आजूबाजूला पाणी भरले. त्यानंतर त्या आठ तरुणांनी आरडाओरड सुरु केली. तो ऐकून वैजनाथ गावातील अमित गुरव आणि प्रशांत बारणे यांनी नदीकडे धाव घेतली. नदीमध्ये आठ तरुण अडकल्याचे पाहून त्यांनी गावात जावून सूरज गुरव यांना माहिती दिली. गुरव यांनी गावातील गणेश भोईर, सरदार कांबळे, शरद रमेश पवार, नामदेव कातकरी तसेच अमित गुरव आणि प्रशांत बारणे यांना सोबत घेतले व दोरखंड घेवून नदी गाठली.

नदीमध्ये अडकलेल्या त्या सर्व तरुणांना दोरखंडाच्या सहाय्याने एक एक करीत बाहेर काढले. मात्र त्यानंतर रत्नागिरी येथील त्या तरुणांनी आपल्या जीपमध्ये बसून धूम ठोकली.





(छाया : संतोष पेरणे)

### दुपारीच पाणी सोडल्याने ओढवला बाका प्रसंग

*दर रविवारी उशिरा धरणातून पेज नदीत पाणी सोडले जाते, मात्र १९ जून रोजी धरणातून दुपारीच पाणी सोडण्यात आले आणि पेज नदीचे पाणी अचानक वाढले. परिणामी झिरो बंधाऱ्याच्या आजूबाजूला पाणी वाढले आणि येथे गेलेले ते आठ तरुण अडकले, अशी माहिती वैजनाथ ग्रामस्थ सूरज गुरव यांनी दिली.*

---

# पालीत व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

## ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका रहिवासी संघाच्या वतीने व टाटा कॅपिटलच्या सहकार्याने पाली येथील मराठा समाज हॉलमध्ये रविवारी (दि.१९) विद्यार्थी व पालकांसाठी नोकरी व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. हरिश्चंद्र शिंपी यांनी दहावी-बारावीनंतर कोणते करीअर करता येईल, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तालुक्यातील ३०० विद्यार्थी आणि पालकांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेची माहिती देऊन विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत नोकरी-व्यवसायात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले.

मराठा समाजाचे तालुका अध्यक्ष गणपत सितापराव, उपाध्यक्ष गंगाधर जगताप, बळीराम निंबाळकर, विठ्ठल खेरटकर, वसंत लहाने, शंकर काळभोर, गणपत डिगे, विजय पवार, प्रकाश शिलकर, विजय जाधव, दत्तात्रय सागळे, राकेश थोरवे, अजय जाधव, श्याम बगडे, भगवान तेलंगे, दत्तात्रय दळवी आदी उपस्थित होते. ग. बा. वडेर शाळेचे शिक्षक सुजित जगताप यांनी सूत्रसंचालन केले, तर सरचिटणीस राजू पातेरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



---

# रायगड लोकसभा मतदारसंघाच्या संयोजकपदी अॅड. महेश मोहिते

## ■ मुरूड तालुका भाजपकडून विशेष सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदार संघाच्या संयोजकपदी नियुक्ती झाल्याबद्दल भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अॅड. महेश मोहिते यांचा मुरूड शहर भाजप कार्यालयात रविवारी (दि. १९) ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आगामी लोकसभा निवडणुकीचे नियोजन आणि तयारीच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र प्रदेश भाजपकडून रायगड लोकसभा मतदार संघाचे प्रभारी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांची तर संयोजक म्हणून अॅड. महेश मोहिते यांची नियुक्ती कारण्यात आली आहे. त्याबद्दल मुरूड तालुका भारतीय जनता पार्टी तर्फे दोघांचेही अभिनंदन करण्यात आले आहे. अॅड. महेश मोहिते रविवारी मुरूड दौऱ्यावर आले असता शहरातील पक्ष कार्यालयात ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांनी त्यांना शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. या वेळी आण्णा कंधारे यांनी अॅड. मोहिते यांच्या पक्षकार्याचे कौतुक केले.

भाजपचे मुरूड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष परेश किल्लेकर, शहर अध्यक्ष उमेश माळी, युवती अध्यक्षा भाविका किल्लेकर, महेश मानकर, सहसचिव नरेश वारगे, संघटक प्रवीण बैकर, बाळा भगत, हनीफ उलडे, सुधीर पाटील, शैलेश काते, समीर शिंदे, जगदीश पाटील, मंदाकिनी कासेकर यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



(छाया : संजय करडे)

---

# रोह्यातील शिबिरात आदिवासींची आरोग्य तपासणी

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील खांबेरे ग्रामपंचायत हद्दीतील गायचोळ आदिवासीवाडी येथे हंटसमन इंटरनॅशनल इंडिया प्रा लिमिटेड यांच्या पुढाकाराने व फ्रीडम फॉर यू फाउंडेशन -मुंबई या संस्थेच्या सहकार्याने आदिवासी समाजातील नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात १२२ नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधांचे वाटप करण्यात आले.

गायचोळ येथील शिबिरात डॉ. रवी कुमार, डॉ. प्रिती दुबे, वरिष्ठ प्रोग्राम मॅनेजर व्हेलॉइस फर्नांडिस, मॅनेजर विधी प्रेमचंदानी, योग तज्ज्ञा डॉ. रश्मीता तसेच परिचारिका सुनिता विश्वकर्मा, खुशबू गौतम, वर्षा जाधव यांनी नागरिकांची आरोग्य तपासणी केली.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महेश पेंडसे तसेच आशा सेविका रसिका सावंत, अंगणवाडी सेविका निलिमा शेडगे, मदतनीस जया वाघमारे, माजी सरपंच तुळशीराम पवार, ग्रामपंचायत सदस्या वंदना पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.



(छाया : महादेव सरसंबे)

---



(छाया : धम्मशील सावंत)

# खवय्यांच्या उड्या आता गोड्या पाण्यातील माशांवर

## सुधागडात गाबोळीच्या माशांना अधिक पसंती

**पाली : प्रतिनिधी**

समुद्रातील मासेमारीवर बंद असल्याने खवय्यांच्या उड्या आता गोड्या पाण्यातील माशांवर पडत आहेत. सुधागड तालुक्यातील बाजारांत सध्या गोड्या पाण्यातील मासे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असून, त्यातील गाबोळीच्या (पोटात अंडी असलेल्या) माशांना अधिक पसंती दिली जात आहे. बाजारात विक्रीस आलेले गाबोळीचे मासे हातोहात संपत आहेत.

सुधागड तालुक्यात नदी, तलाव, धरण, ओढे तसेच शेतात साठलेल्या गोड्या पाण्यात सापडणाऱ्या माशांची आवक वाढली आहे. त्यामध्ये मळे, कोलीम, शिवडा, डाकू मासे, अरलय, वाम, मोठी कोलंबी, कटला, शिंगटी, चिवण्या, खवल आदी माशांचा समावेश आहे. मागील वर्षापेक्षा यंदा २० ते ३० टक्क्यांनी किमती वधारल्या आहेत. पावसाळ्याच्या सुरुवातीस सापडणाऱ्या बहुतांश माशांच्या पोटात अंडी असतात. त्याला स्थानिक भाषेत पेर किंवा गाबोळीचे मासे म्हणतात. ही गाबोळी किंवा अंडी खवय्ये अतिशय ताव मारुन खातात. कोळी बांधवांबरोबरच प्रामुख्याने आदिवासी आणि गळभोई समाजातील लोक खुप मेहनतीने हे मासे पकडतात.

**“ सध्या गोड्या पाण्यातील मासे मुबलक मिळत आहेत. बहुतांश माशांमध्ये हमखास अंडी असतात. हे मासे खूप चविष्टदेखील असतात. या हंगामात विविध प्रकारचे गोडे पाण्यातील मासे खाणे पसंत करतो.**
**-सुलतान बेणसेकर, खवय्या, पाली, ता. सुधागड**

### उधवण किंवा वळगणीच्या माशांना मागणी

***जोरदार पावसानंतर पाणी वाढल्यावर खाडीतील तसेच नदितील मासे शेतातील कमी पाण्यात किंवा ओहळात अंडी देण्यासाठी येतात. या माशांना पकडण्यासाठी मोठी झुंबड उडते. यालाच उधवण किंवा वलगणीचे मासे असे म्हणतात. वळगणीचे मासे पकडण्यासाठी जाळे, पाग, लोखंडी तलवार आदी साधनांचा वापर केला जातो.***

---

# जीएसटी संकलनाची माहिती द्या

## जि. प.च्या सर्व विभागांना आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

कंत्राटदारांकडून मागील पाच वर्षांमध्ये वसूल करण्यात आलेल्या जीएसटी संकलन व जीएसटी परताव्याची माहिती देण्याचे निर्देश रायगड जिल्हा परिषदच्या लेखा विभागाने सर्व विभागांना दिले आहेत.

राजिपमध्ये कंत्राटदारांकडून वसुल करण्यात आलेल्या जीएसटी संकलन व जीएसटी परतावा यात तफावत आहे. ग्रामीण पाणीपुरवठा, बांधकाम विभागात विकासकामांबाबतची करोडोंची बिले आदा केली जातात, मात्र काही ठेकेदार त्यांच्या राजकीय प्रभावाचे अस्त्र वापरून जीएसटीची रक्कम एका बोगस खात्यात भरणा करून जीएसटी भरला गेला आहे असे दाखवितात व तीच रक्कम परस्पर काढून घेतात असा, आरोप संजय सावंत यांनी केला आहे.

याबाबत सावंत यांनी जि.प.चे मुख्य लेखाधिकाऱ्यांकडून माहिती मागविली होती. याची दाखल घेऊन मागील पाच वर्षांच्या कालावधीमध्ये खर्ची पडलेल्या बिलांमधून वसूल करण्यात आलेल्या एकूण जीएसटी कराची माहिती, वसूल करण्यात आलेली जीएसटीची रक्कम ज्या खात्यांमध्ये जमा करण्यात आली त्या खात्यांचा तपशील, भरणा करण्यात आलेल्या रक्कमांचे व्हाऊचर्स तसेच कंत्राटदारांना जीएसटी परतावा दिला असल्यास हा परतावा कोणत्या खात्यामध्ये जमा करण्यात आला त्याची तपशिलवार माहिती जि.प.ने मागविली आहे.

---

**ग्रामपंचायत गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**

## जाहीर निविदा

सर्व अधिकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत गव्हाण १५वा वित्त आयोग फंडातून खालील कामासाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत, तरी अधिकृत ठेकेदारांनी दि. २१/०६/२०२२ ते २७/०६/२०२२ पर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास सकाळी ११:०० वाजेपर्यंत उघडण्यात येतील. त्या वेळी उपस्थित रहावे. कोणतेही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

| अ. नं. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे गव्हाण येथील कन्याशाळा येथे पत्राशेड उभारणी करणे. | ४,९८,११०/- | ४,९८१/- | ५००/- | ३ महिने | ग्रामपंचायत फंड |

**अटी व शर्ती :-**

१. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. सदर कामांचे अंदाजपत्रकिय रक्कम ३०००००/- वरील सर्व कामांना नोंदणीकृत (रजिस्ट्रेशन) ठेकेदारांनीच कामाची निविदा भरावी.
३. इसारा रक्कम व निविदा फी रोखीत भरावी लागेल.
४. निविदा फी ना परतावा समजावी.
५. नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल. तसेच पॅनकार्डची झेरॉक्स सोबत जोडणे बंधनकारक राहील.
६. अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
७. निविदा मंजूर केल्यास रूपये १००च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा द्यावा लागेल.
८. सुरक्षा अनामत रक्कम ५%, इन्कमटॅक्स २.३०%, ग्रामपंचायत विकास निधी ५%, वर्क इन्शुरन्स् १% अशा रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
९. सुरक्षा अनामत ९० दिवसांनी कामांचा दर्जा पाहून परत मिळेल.
१०. कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतील काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
११. सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करणेचे आहे.
१२. वरील अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.
१३. काम चालू करताना फोटो, काम चालू असताना फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचा फोटो बंधनकारक राहील.
१४. सदर कामाचे बील रक्कम रूपये २,५०,०००/-च्या पुढील रक्कमेवर १% जी.एस.टी तसेच १% सी.एस.टी कर कापणे अनिवार्य आहे. ठेकेदाराकडे जी.एस.टी. व सी.एस.टी. नंबर असणे बंधनकारक राहिल.

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत गव्हाण**

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत गव्हाण**

---

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. २ व ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात (रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२१/२०२२**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. जितेंद्र राजेंद्र वाघमारे**
रा. योगेश्वरी दत्त कॉम्प्लेक्स, सी/१०९, फ्लॅट नं. १, सेक्टर नं. १२, कामोठे, ता-पनवेल, जि-रायगड. ४१०२०८
**२) श्रीमती. रुबीना अख्तर अल्ली सय्यद**
रा. कामोठे, हनुमान मंदिरासमोर, घर नं. ७४५/बी, कामोठे गाव, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०८
**३) श्री. राजेश पोमा पवार**
रा. इंद्रप्रस्थ को-ऑप. हौ. सोसायटी, आय ३०४, सर्व्हे नं. २८/१/३, आदई गाव, पो. नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६
} **प्रतिवादी**

**दावा रुपये १७,४०२/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०४/०७/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १४/०६/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

---

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. २ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात (रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२५/२०२२**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. संतोष महादेव चौगुळे**
रा. पळस्पे, रुम नं. १०२, पहिला मजला, नॅशनल पार्क, पो-पळस्पे, ता-पनवेल, जि-रायगड. ४१०२०६
**२) श्री. सोपान राजाराम जाधव**
रा. कावेरी को.ऑप.हौ. सोसायटी, आसुडगाव, खांदा कॉलनी, ता-पनवेल, जि-रायगड. ४१०२२१
**३) श्री. अरूण बाबू कातरे**
रा. सिमरन पार्क, बी-३०२, प्लॉट नं. ९९/१००, सेक्टर-८, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६
} **प्रतिवादी**

**दावा रुपये ९,०६,५१२/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०४/०७/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १४/०६/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

---

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. २ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात (रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२७/२०२२**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. वसंत धनू लोखंडे**
रा. श्रीकुंज को-ऑप.हौ.सो., रुम नं. २०६, ४८/बी, सेक्टर नं. १४, कामोठे गाव, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०८
**२) सौ. आशा सुनील साळवे**
रा. श्रीयोग कॉम्प्लेक्स, सेक्टर नं. १२, प्लॉट नं. १, कामोठे, ता-पनवेल, जि-रायगड.
**३) सौ. अनिता सिद्धार्थ भोसले**
रा. २/सी विंग, शुभंगल को-ऑप. हौ. सोसायटी, सेक्टर नं. ७, प्लॉट नं. २५ अे, कामोठे, ता-पनवेल, जि-रायगड.
} **प्रतिवादी**

**दावा रुपये १८,००५/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०४/०७/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १४/०६/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

# डेकोरेटर्सकडून थर्माकोलचा सर्रास वापर

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य शासनाच्या आदेशानुसार नवी मुंबई पालिकेकडून प्लास्टिक व थर्माकोलवर बंदी लादली गेली आहे. त्यानुसार पालिकेकडून अनेकदा कारवाया केल्या गेल्या आहेत. थर्माकोलवर बंदी लादलेली असताना नागरिकांकडून गणेशोत्सव व नवरात्रोत्सवात इको-फ्रेंडली देखावा करीत त्यास साथ दिली जात आहे, मात्र दुसरीकडे काही डेकोरेटर्सकडून बेसुमार थर्माकोलचा वापर केला जात असल्याचे दिसून येत आहे. नेरूळ येथील तांडेल मैदानात हे चित्र पाहण्यास मिळत असून डेकोरेटर्सने सेट काढून १५ ते २० दिवस उलटले तरीही अद्याप हा थर्माकोल मैदानावर पडलेला दिसत आहे.

सिवूड्स येथील तांडेल मैदानाचे दोन भाग पालिकेने बनवले आहेत. यात एक भाग स्थानिकांना क्रिकेट खेळण्यास मध्ये तारांचे कुंपण टाकून दुसरा भाग वेगळा केला आहे. या भागात तारांभोवती मियावाकी अंतर्गत साडेचार हजार झाडे लावली आहेत. हा भाग लग्न समारंभ तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी दिला जातो. यात मोठमोठे लग्नसोहळे होत असतात. साधारण २० दिवसांपूर्वी या भागात मोठा लग्नसोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यात भले मोठे सेट डेकोरेटर्सने उभारले होते. लग्नसोहळा उरकल्यावर जवळपास आठवडाभर डेकोरेटर्सकडून सेट काढून घेण्याची व सामान आवराआवरी सुरू होती. सर्व सामान आवरून झाल्यावर डेकोरेटर्सकडून सेटमधील महत्त्वाचे भाग काढून उर्वरित नको असलेले अनेक भाग या मैदानात टाकल्याचे आढळून आले आहेत. यात मोठमोठे थर्माकोलचे ठोकळे असून डेकोरेटर्सकडून बेसुमार थर्मकोलचा वापर केला गेल्याचे आढळून आले आहे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डेकोरेटर्सना दंड ठोठवणे गरजेचे आहे; अन्यथा यापुढेदेखील थर्माकोलचा वापर केला जाण्याची शक्यता आहे. आयुक्तांनी याबाबत कठोर भूमिका घेण्याची मागणी वाढू लागली आहे.

## नवी मुंबईतील मैदानात कचरा



### पालिकेने कारवाई करण्याची मागणी

**गणेशोत्सव व नवरात्रोत्सवात महापालिकेकडून दुकानांवर कारवाई करण्यात येते. दंड ठोठाविण्यात येतो, मात्र डेकोरेटर्सकडून खुलेआम थर्माकोलचा वापर केला जात असतानाही विभाग अधिकाऱ्यांकडून कोणतीच कारवाई केली गेलेली नाही. १५ ते २० दिवस उलटून गेल्यावरदेखील मैदानात थर्माकोल पडून असून अस्वच्छता पसरलेली आहे. या संदर्भात कारवाईची मागणी होत आहे.**

### मियावाकी प्रकल्पाला हानी पोहचण्याची शक्यता

**लग्न समारंभात डेकोरेटर्सकडून सेट व पडदे उभारताना मियावाकी रोपामध्ये लोखंडी व लाकडी खांब उभे केले जात आहेत. त्यामुळे मियवाकी प्रकल्पात वाढणाऱ्या रोपांना हानी पोहचण्याची शक्यता आहे.**

# एक व्यक्ती, एक झाड उद्दिष्टाकडे वाटचाल -बांगर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



महापालिकेने शहरात आतापर्यंत २५०हून अधिक लहान-मोठी उद्याने फुलवली आहेत. शहरात हिरवळ आहेच. दोन वर्षांपूर्वी शहरात चार व्यक्तींच्या मागे तीन झाडे होती, मात्र या वर्षी एका व्यक्तीच्या मागे एक झाड या उद्दिष्टाकडे आम्ही वाटचाल सुरू केली आहे, असे प्रतिपादन नवी मुंबईचे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी एका वृत्तपत्राशी संवाद साधताना केले.


नवी मुंबईत त्यांनी वृत्तपत्रांविषयी असलेली त्यांची आस्था व्यक्त करीत त्यांनी वृत्तपत्रांचे काम कसे चालते हेही जाणून घेतले. शिवाय नवी मुंबईसारख्या आधुनिक शहराच्या ध्येय धोरणांविषयी चर्चा केली. येत्या काळात नवी मुंबई महापालिकेत अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास येणार असून, त्यामुळे नवी मुंबई पालिका राज्यात पहिल्या क्रमांकावर असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नवी मुंबईत आव्हाने आहेत, मात्र सोयी-सुविधाही अधिक आहेत. स्वच्छतेमध्ये शहर पहिल्या क्रमांकावर आहे. देशात पहिला क्रमांक मिळावा म्हणून आम्ही प्रयत्न करत आहोत. या नियोजनबद्ध आधुनिक शहराचे पुढचे भविष्यही उज्ज्वल असेल, असे त्यांनी अधोरेखित केले.

नवी मुंबई ही सर्वार्थाने राहण्यास सुविधापूर्ण शहर म्हणून उदयास आली आहे व आता यापुढील टप्प्यात तेथे पर्यटनाच्या नव्या संधी कशा उभारता येतील, याची चाचपणी आम्ही सुरू केली आहे. तेथे प्राणीसंग्रहालय, मत्स्यालय या गोष्टींसाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. शहरातील नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी, शहरातील आरोग्य सुविधा सुधारण्याबरोबरच नागरिकांचे मानसिक आरोग्य सुदृढ राहावे म्हणून शहरात हिरवळ वाढवण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपक्रमांची त्यांनी माहिती दिली. स्थलांतरित रोहित (फ्लेमिंगो) पक्ष्यांसाठी नवी मुंबई हे हक्काचे ठिकाण वर्षानुवर्षे आहे. आम्ही प्रथमच या शहराचे फ्लेमिंगो सिटी असे नामकरण केले व त्याचे महत्त्व ओळखले आहे. यापुढेही रोहित पक्ष्यांचा अधिवास टिकविण्यासाठी, तसेच त्यांचा अभ्यास करण्यासाठी नागरिकांना अधिक सुरक्षित सुविधा देण्याचा आमचा मानस आहे, असे बांगर यांनी सांगितले.

ऐरोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन हे इतर कोणत्याही स्मारकापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे आहे. तेथील ग्रंथांची मांडणी, पुतळ्याशिवाय छायाचित्रे व अन्य प्रतिकांनी बाबासाहेबांचे विचार व माहात्म्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. या स्मारकात यापुढे अधिक आधुनिक तंत्राचा उपयोगही केला जाणार आहे, असे ते म्हणाले.

# नेरूळमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**



आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने हावरे सेंच्युरियन मॉल येथे नवी मुंबई योग विज्ञान संस्थेच्या वतीने योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, भाजप माजी जिल्हाध्यक्ष भगवानराव ढाकणे, योग विज्ञान संस्थेचे प्रधान बी. बी. सिंग, ए. के. चंचल, मॉलचे अध्यक्ष सरोज नायक, उपाध्यक्ष दिलीप परब, अलका अगरवाल, छाया वारे, सुधीर वाडेकर, जनार्दन राम, शशी पांडे, एच. एन. प्रसाद, दिनेश पासोरिया, दिलीपकुमार आहुजा, मधुकर गावडे आदी उपस्थित होते.

# भवानी फाउंडेशनच्या रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

भवानी फाउंडेशन सामाजिक बांधिलकी जपत बेलापूर येथे महात्मा गांधी हॉस्पिटल कामोठ्याच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी ज्येष्ठ कर्करोग तज्ञ ड्रॉ. शिशिर शेट्टी यांनी रक्तदान हे प्राण वाचवणारे दान आहेच, पण अवयवदान हे पवित्रदान आहे. मरणोत्तर आपले अवयव हे गरजू रुग्णांचे आयुष्य सुलभ करते, असे सांगितले.




रक्तदान शिबिराचे हे सातवे वर्ष होते. या वेळी झालेल्या रक्त संकलनांने ड्रॉक्टरांनी समाधान व्यक्त केले. एकूण १५१ युनिट रक्त संकलन झाले. हे रक्त गरीब कॅन्सरच्या रुग्णांसाठी उपयोगात येणार असल्याची माहिती भवानी फाउंडेशनने दिली. भवानी फाउंडेशनचे संस्थापक कुसुमोदर शेट्टी यांनी फाऊंडेशन करत असलेल्या सामाजिक उपक्रमाची माहिती दिली. आईपासून प्रेरणा घेऊन घेतलेला समाजसेवेचा वसा भवानी फाउंडेशन कधी सोडणार नाही, असा विश्वास त्यांनी वक्त केला.

कार्यक्रमास महाराष्ट्र भाजयुमोच्या युवती संयोजिका मीना केदार यांनी आपले मनोगत वक्त करतांना सांगितले की, भवानी फाउंडेशनने सामाजिक व शैक्षणिक कामाचा देशभर विस्तार करावा. शांताराम शेट्टी, धर्मपाल देवडिगा, बालकृष्ण भंडारी, दिनेश शेट्टी भवानी फाउंडेशनचे सभासदा सह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# नवी मुंबईतील बाजारपेठेत पावसाळी फळांची आवक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबईत पावसाला सुरुवात झाली नसली तरी बाजारात मात्र सर्व प्रकारच्या पावसाळी फळांची आवक सुरू झाली आहे. लाल चुटुक चेरी, लाल रंगाचे आलू बुखार, प्लम, लाल-पिवळे ओले खजूर, लिची यासारख्या फळांनी बाजारपेठ भरून गेली आहे. या बहुतांशी फळांचा रंग लाल असल्याने बाजारात लाल रंग सध्या उठून दिसत आहे.

दरवर्षी पावसाळा सुरू झाला की, ही फळे बाजारात दिसू लागतात. मात्र यावर्षी मुंबईसह नवीमुंबई परिसरात अद्याप हवा तसा पाऊस पडला नसला, तरी इतर ठिकाणी तो सुरू झाला आहे. त्यामुळे तिकडे या फळांचे उत्पादन चांगले झाले आहे. परिणामी, इकडे मुंबईच्या बाजारपेठेत ही फळे दाखल झाली आहेत. काश्मीरहून येणारी चेरी सध्या २०० ते ३०० रु किलो या दराने उपलब्ध आहे, तर बिहारच्या लिचीचा १२ ते १५ किलोचा बॉक्स दीड हजाराच्या घरात आहे. गुजरातहून येणारे खजूर ८० ते १०० रुपये किलो दराने विकले जात आहेत. काश्मीरच्या प्लमला बाजारात २०० ते ४०० रुपये किलो दर मिळत आहे.

किरकोळ बाजारात ही फळे २०० ते ४०० रुपये किलोच्या घरात आहेत. चवीला आंबट-गोड असणाऱ्या या फळांमध्ये क जीवनसत्त्व अधिक असते. त्यामुळे पावसाळ्यात त्यांना चांगली मागणी असते. आता या फळांची आवक सुरू झाली असल्याने त्यांचे दर काहीसे चढे आहेत, मात्र आवक वाढली की दर आणखी खाली येण्याची शक्यता व्यापारी रामबाशिष्ट जयस्वाल यांनी व्यक्त केली आहे.

# दहावीच्या परीक्षेत शिरढोणमधील फडके विद्यालयाचा १०० टक्के निकाल



**खारघर : प्रतिनिधी**

सु. ए. सो.च्या शिरढोण येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके माध्यमिक विद्यालयाचा मार्च २०२२च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे.

पनवेल तालुक्यातील माध्यमिक विद्यालय शिरढोण या विद्यालयातील मार्च २०२२ मध्ये एस. एस. सी. परीक्षेस प्रविष्ठ झालेले सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झालेले असून विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला आहे निकालाची उज्वल परंपरा चालू ठेवलेली आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मुख्याध्यपिका आर. आर. सोनावणे, सर्व शिक्षक-शिक्षिका व शालेय कर्मचारीवर्ग यांनी घेतलेली अफाट मेहनत विचारात घेऊन स्थानिक शालेय कमिटी अध्यक्ष पांडुरंग मुकादम, राम भोईर, शाम ठोंबरे, चंद्रकांत ठोंबरे, कांचन मुकादम, धनाजी महाडिक, रवींद्र मुकादम, विश्वनाथ भोपी, साधना वाजेकर, महेश देशमुख, संतोष जळे, राम हातमोडे, सुदाम माळी आदी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शालेय मुख्याध्यापिका, शिक्षक - शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांना गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचेही शब्दसुमनाने कौतुक केले आहे. शालेय निकालाची उज्वल परंपरा अखंडीत तेवत राहावी म्हणून संस्थेचे अध्यक्ष वसंत ओसवाल, सचिव रवी घोसाळकर, स्थानिक शालेय कमिटीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, शिरढोण ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, पंचक्रोशीतील ग्रामस्थ व माजी विद्यार्थी यांच्याकडून शालेय मुख्याध्यापिका, शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन व भ्रमणध्वनीवरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नवी मुंबईतील ६४ हजार ९९९ बालकांनी घेतला पोलिओचा डोस



**नवी मुंबई : बातमीदार**

पालिका आरोग्य विभागाच्या वतीने महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि. १९) उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम महानगरपालिका क्षेत्रात प्रभावी रितीने राबविण्यात आली. नवी मुंबई महापालिकेच्या २३ नागरी आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे दवाखाने, सोसायटी कार्यालये, रूग्णालये, रेल्वे स्टेशन, बस डेपो, महत्वाचे नाके अशा विविध ठिकाणी ६०० स्थायी, ९४ ट्रान्झिट व २८ फिरते मोबाइल असे एकूण ७२२ पोलिओ लसीकरण बूथ स्थापन करण्यात आले होते. यामध्ये ६४ हजार ९९९ बालकांना पोलिओ लसीकरण करण्यात आले. म्हणजेच ७३ टक्के अपेक्षित लाभार्थी मुलांचे लसीकरण झालेले आहे.

'दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी' या घोषवाक्यास अनुसरून पाच लाख ३४ हजार ६६१ घरांपर्यंत नागरी आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून पोलिओ लसीकरण मोहीमेची माहिती पोहचविण्यात आली. ८७४ पथकांव्दारे जनजागृती करण्यात आली. या शिवाय महानगरपालिका क्षेत्रात ७२३ बॅनर्स आणि दोन हजार ९३६ पोस्टर्समधून व्यापक प्रमाणात माहिती प्रसारित करण्यात आली. साधारणत: ८९ हजार ४४५ इतके पाच वर्षांखालील लाभार्थी नजरेसमोर ठेवून या मोहिमेचे नियोजन करण्यात आले होते.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लसीकरण बूथवरील दोन हजारांहून अधिक कर्मचारी, स्वयंसेवक यांना लसीकरणाचे प्रशिक्षण देण्यात आले होते तसेच कोविड सुरक्षाविषयक बाबींचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या अनुषंगाने मुलांसह लसीकरणासाठी येणाऱ्या नागरिकांनी परस्परांमध्ये सुरक्षित अंतर राखावे याची काळजी घेण्यात आली. मास्कचा वापर बुथवरील स्वयंसेवकांना अनिवार्य करण्यात आला होता. बालकाला लस पाजण्यापूर्वी व पाजल्यानंतर हात सॅनिटाईज करण्यात येत होते. लस देताना बालक पालकाकडेच असेल याची काळजी घेऊन बाळाला स्पर्श न करता तसेच ड्रॉपरचा स्पर्श बाळाच्या तोंडाला होणार नाही याची दक्षता घेऊन लस पाजण्यात आली. कोविड सुरक्षा विषयक सर्वोतोपरी काळजी पोलिओ बूथवर घेण्यात आली.

काही कारणांमुळे ज्या संभाव्य लाभार्थी बालकांचे लसीकरण होऊ शकले नाही त्यांना २० ते २४ जून २०२२ या कालावधीत घरोघरी जाऊन पल्स पोलिओ डोस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**आपला भारत देश कायमस्वरूपी पोलिओमुक्त रहावा यादृष्टीने उप राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेस नवी मुंबईकर नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला, मात्र ज्या बालकांना रविवारी बूथवर जाऊन डोस घेता आलेला नाही अशा बालकांसाठी विशेष मोहीम राबविली जात असून घरांना भेट देणाऱ्या स्वयंसेवकांना आपल्या बालकांबाबत योग्य माहिती देऊन पोलिओ डोस पाजून घेण्याबाबत संपूर्ण सहकार्य करावे.**

**-अभिजित बांगर,**
**आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# अल्झायमर आजारावरही स्टेम सेल थेरपी ठरतेय प्रभावी

**नवी मुंबई : बातमीदार**

अल्झायमर हा उतारवयातील विकार आहे. यामध्ये विस्मरण, स्थळ तसेच काळाचे भान कमी होणे, मूड स्विंग्ज, बोलताना अडखळणे तसेच अस्वच्छता, परत परत तेच शब्द येणे, ओळखायला न येणे, बोलणे न समजणे, आणि एकूण भ्रमिष्टपणा ही वाढती लक्षणे दिसून येतात. ठराविक व्यक्तीची शब्दसंपत्ती कमी होत जाते. वाक्यरचना तुटक होते आणि शेवटी व्यक्ती मूक होते. पुढेपुढे दैनंदिन व्यवहार तसेच खाणे, पिणे, स्वच्छता, कपडे घालणे वगैरे गोष्टीपण अवघड होत जातात. हळूहळू व्यक्ती परावलंबी होत जाते. या आजारावर स्टेम सेल थेरपी प्रभावी ठरणारी आहे, असे नवी मुंबईतील डॉ. प्रदीप महाजन यांनी सांगितले.

जागतिक स्तरावर अल्झायमर रोगाच्या सतत वाढत असलेल्या घटनांसह अनेकजण त्यांच्या स्मृती गमावत आहेत, किंबहुना मूलभूत क्रियाकलाप लक्षात ठेवण्याची क्षमतादेखील गमावत आहेत. अल्झायमर रोग हा स्मृतिभ्रंश होण्याचे एक प्रमुख कारण आहे आणि गेल्या दशकापर्यंत अंदाजे ३.७ दशलक्ष भारतीय या आजाराने ग्रस्त आहेत. रोगाच्या सुरुवातीच्या लक्षणांबद्दल जागरूकता नसणे आणि संबंधित जोखमींबद्दलचे अपुरे ज्ञान, उशिराने होणारे निदान आणि त्वरित हस्तक्षेपांमध्ये येणारी आव्हाने यामुळे या आजाराचे प्रमाण वाढत आहे.

या विकाराचे मुख्य कारण म्हणजे मेंदू आकसत जातो व अकार्यक्षम होतो. मेंदूतले सूक्ष्म तंतू एकमेकात गुंतून जाळी तयार होतात. मेंदूत एका सदोष प्रथिनाचे प्रमाण वाढत जाते. रक्तवाहिन्यांमध्येदेखील थर जमायला लागतात. यामुळे रक्तप्रवाहाची कुचंबणा होते. त्यामुळे रुग्ण गोष्टी विसरण्यास सुरुवात करतो आणि प्राप्त केलेली संवेदी माहिती आणि आवश्यक कृती यांच्यातील दुवा तयार करण्यात हळूहळू अपयशी ठरतो. उदाहरणार्थ, प्रगत अवस्थेत, लोकांना (कुटुंबातील सदस्यांसह) ओळखता न येण्याव्यतिरिक्त, रुग्णाला टूथब्रशचे काय करावे किंवा दरवाजाचे कुलूप कसे लावावे हे माहित नसते, जरी या गोष्टी त्याच्या/तिच्याकडे असतील. अशा रुग्णाच्या जीवनाच्या एकूण गुणवत्तेवर परिणाम होत असल्याने, काळजी घेणाऱ्यांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

दुर्दैवाने, रोगाचा उपचार करण्यासाठी कोणतीही औषधे नाहीत. अशाप्रकारे या स्थितीला आटोक्यात आणण्याचा प्रयत्न आपण करू शकतो. ४५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक व्यक्तीने वार्षिक आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक. याद्वारे अल्झायमर लवकर ओळखू शकू आणि ही स्थिती नियंत्रित करण्याजोगे उपक्रम आणि उपचार सुरू करू शकू, अशी प्रतिक्रिया डॉ. प्रदीप महाजन यांनी दिली.

डॉ. महाजन क्लिनीकमध्ये सेल आणि ग्रोथ फॅक्टर-आधारित थेरपी उपलब्ध आहे जी विविध रोगांच्या उपचारांसाठी शरीरातील नैसर्गिक उपचार क्षमता वापरण्यावर लक्ष केंद्रित करते. आपल्या शरीरात स्टेम सेल्स आणि वाढीचे घटक आहेत, जे जळजळ नियंत्रित करण्यासाठी, इतर पेशींची कार्ये वाढविण्यासाठी आणि गमावलेल्या ऊतींचे पुनरुत्पादन करण्यासाठी निरोगी पेशींचा कार्यरत करण्यास मदत करतात. सेल-आधारित थेरपीद्वारे आम्ही हे रेणू केवळ आवश्यक ठिकाणी योग्य प्रमाणात प्रदान करत करत असल्याची माहिती डॉ. महाजन यांनी दिली.

ते पुढे म्हणतात, इतर अनेक रेणू आहेत, उदाहरणार्थ चेपेरोन्स (सहायक प्रथिने) आणि एक्सोसोम्स (सेल-संबंधित अनुवांशिक सामग्री, प्रथिने, रोगप्रतिकारक पेशी इ.) जे संदेशवाहक रेणू म्हणून कार्य करतात आणि मज्जातंतूंना गोंधळात टाकण्यास मदत करतात. मेंदूमध्ये तंतू आणि प्रथिने जमा होतात. मेंदूमध्ये निरोगी वातावरण निर्माण करण्यासाठी आणि अंतर्गत संतुलन (होमिओस्टॅसिस) पुनसंचयित करण्यासाठी याचा उपयोग केला जाऊ शकतो.

अधिक लक्ष्यित उपचारांवर संशोधन केले जात असल्याने भविष्यात अल्झायमर रोखणे शक्य होईल. सध्या तरी रिजनरेटिव्ह मेडिसिन हे रुग्णांना शक्य तितक्या काळ नैसर्गिक, कमीत कमी आक्रमक पद्धतीने स्वतंत्र जीवन जगण्यास मदत करण्यासाठी आशेचा किरण असू शकते, असेही डॉ. महाजन यांनी स्पष्ट केले.

# वरुणराजाचा बळीराजाला दिलासा

## नागरिकही सुखावले

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांपासून रायगड जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडत आहे. सोमवारी (दि. २०) सकाळी ८ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी २७ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. अलिबाग येथे सर्वाधिक ६५ मिमी पावसाची नोंद झाली. २० तारखेपर्यंत सरासरी ११० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात पुढील दोन दिवसांत काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याचा इशारा प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे.

यंदा मान्सून काहीसा उशीराने दाखल झाला. पावसाआभावी शेतीची कामे रेंगाळली होती, मात्र गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात चांगल्या पावासाला सुरवात झाली आहे. रायगड जिल्ह्यात पुढील दोन दिवसात काही ठिकाणी अतिवृष्टी तर तुरळक ठिकाणी तीव्र ते अतितीव्र पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

सोमवारी सकाळी आठ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासात जिल्ह्यात सरासरी २७ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. सर्वाधिक पाऊस अलिबाग येथे पडला. तिथे ६५ मिमी पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल श्रीवर्धन येथे ६० मिमी, माथेरान येथे ५२ मिमी, मुरूडला ३६ मिमी, खालापुरमध्ये ३६ मिमी पाऊस नोंदविण्यात आला. माणगाव येथे सर्वात कमी म्हणजेच तीन मिमी पावसाची नोंद झाली आहे.

## दुबार पेरणीचे संकट टळले; शेतीकामांना आला वेग

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील भात पेरणी जवळपास पुर्ण झाली आहे, मात्र पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. तालुक्यात काही ठिकाणी दुबार पेरणी करावी लागते की, काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र मागील दोनतीन दिवसांपासून पावसाने बऱ्यापैकी हजेरी लावल्याने भात पिकांना जीवदान मिळाले असून दुबार पेरणीचे संकट काहीअंशी तरी टळले आहे.

रोहा तालुक्यातील धाटाव पंचक्रोशी, सुतारवाडी, चणेरा, खांब, वाली, पुई, पुगाव, धानकान्हे, यशवंत खार, मेढा या विभागातील पेरणी पुर्ण झाली असल्याने शेतकऱ्यांची इतर मशागतीची लगबग सुरु झाली आहे. गेल्या काही दिवसापासून पाऊस नसल्याने बळीराजाचे डोळे पाणावले होते. मात्र वरुण राजा शेतकऱ्यांच्या मदतीला धाऊन आला. रोहा तालुक्यात रात्रीपासूनच पावसाने संततधार लावल्याने शेतांमध्ये पाणी साचलेले दिसून येत आहे.

**यंदा मोसमी पावसाचे आगमन वेळेवर झाले नसले तरी रविवार व सोमवारी रोहे तालुक्यात बऱ्यापैकी पाऊस झाला. शेतीसाठी हे अनकूल वातावरण आहे. काही ठिकाणी भाताची रोपे जमिनीवर आली आहेत. -रुपेश देवजी शिंदे, शेतकरी, तळाघर, ता. रोहा**

(छाया : जितेंद्र जाधव)



## प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीत ८०० झाडे लावण्याचा जि.प.चा संकल्प

**अलिबाग : प्रतिनिधी**

कृषी दिनानिमित्त १ जुलै रोजी रायगड जिल्ह्यात वृक्षलागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या दिवशी प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीत ८०० झाडे लावण्याचे नियोजन करण्यात येत आहे. जिल्ह्यात एकूण ८०२ ग्रामपंचायती असून, त्यामध्ये सहा लाख ४१ हजार ६०० वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.



ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालये, आरोग्य केंद्र व उपकेंद्र, पशुवैद्यकीय दवाखाने, तिर्थक्षेत्र, पर्यटनस्थळे, समुद्र किनाऱ्यावरील खुल्या जागेत, दरड प्रवण क्षेत्रातील डोंगर पायथ्याच्या ठिकाणी, पुरक्षेत्रातील गावामधील नदी किनाऱ्यालगतच्या ठिकाणी ही वृक्षलागवड मोहीम प्रामुख्याने राबविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीला किमान ८०० वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

वृक्षलागवड कार्यक्रमात उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायती, शाळा, विद्यार्थी, कार्यालये, अधिकारी, कर्मचारी यांची स्पर्धा आयोजित करुन जास्तीत जास्त वृक्षलागवड व वृक्षसंगोपन करणाऱ्याचा सत्कार करण्यात येणार आहे.

वृक्षलागवड कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुकास्तर, ग्रामपंचायत स्तरावर, स्वयंसेवी संस्था, स्वदेश फाउंडेशन, रोटरी क्लब, लायन्स क्लब, स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, स्वयंसेवक, स्वयंसहाय्यता बचत गटातील महिला, गावातील महिला मंडळे, भजनी मंडळे व युवक यांचा लोकसहभाग घेणेत यावा व वृक्षलागवड व संवर्धनासाठी शपथ देण्यात यावी, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत.

वृक्ष लागवडीसाठी रोजगार हमी योजने अंतर्गत खड्डे खोदणे, सामाजिक वनीकरण कार्यालयाकडून मागणीप्रमाणे मोफत रोपे उपलब्ध करुन घेणे आणि शासकीय रोपवाटीका येथून ग्रामनिधी अंतर्गत व लोकसहभागातून रोपेखरेदी करण्यात यावी. या कार्यक्रमाची अंमलबजावणी तातडीने करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दत्तक रोपे वृक्षलागवड यादी, फोटोसह सादर करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

### लावलेल्या रोपांचे होणार संगोपन

*जिल्ह्यातील विशेषत: जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील सर्व इयत्ता चौथी ते आठवीपर्यंतच्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक रोप व प्रत्येक शिक्षकाने किमान दोन रोपे आणि सर्व स्तरावरील अधिकारी, कर्मचारी यांनी किमान दोन रोपे दत्तक घेवून वृक्षारोपण करायचे आहे. त्याचप्रमाणे लावलेली रोपे कायमस्वरुपी जगविण्यासाठी त्यांच्याभोवती संरक्षक जाळी, बांबू किंवा लाकडाचे कुंपण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.*

## कर्जतमध्ये श्री ज्ञानसंस्कार वाटिकेची स्थापना

**कर्जत : प्रतिनिधी**

जैन समाजातील लहान मुलांनी संस्कारक्षम जीवन जगावे यासाठी कर्जतमधील पुण्योदय सभागृहात झालेल्या कार्यक्रमात श्री ज्ञानसंस्कार वाटिकेची स्थापना करणात आली.

या वेळी जैन समाजाचे अध्यक्ष जयातीलाल परमार, रणजित जैन, रमेश ओसवाल हे विश्वस्त तसेच जिग्नेश ओसवाल, सचिन ओसवाल, पंकज ओसवाल यांच्यासह जैन भगिनी उपस्थित होत्या.

कर्जत येथील संस्कार वाटिकेमध्ये एकूण ३७ मुले आणि मुली सहभागी झाल्या आहेत. या वाटिकेत मुलांना जैन समाजाबद्दलची माहिती तसेच जीवनामध्ये उपयोगी पडणारी माहिती आदी संस्कार दिले जाणार आहेत.

वाटिका शिक्षक संघाच्या अध्यक्षा म्हणून आशा ओसवाल, उपाध्यक्षा भावना परमार तर सदस्या म्हणून वीना जैन, संगीता जैन, किर्ती जैन, कोमल बाफना, सोनू ओसवाल, कुश ओसवाल, लता हिंगड़, आयुषी जैन, मीना ओसवाल, रीना ओसवाल, सीमा ओसवाल, हर्ष ओसवाल यांची निवड करण्यात आली.


**RAIGAD DEVELOPMENT AUTHORITY**
**C/o OFFICE OF THE COLLECTOR, DISTRICT RAIGAD,**
**ALI BAUG, MAHARASHTRA**

Raigad Development Authority (**RDA**), invites expression of interest from experienced firms /Joint Ventures /Association for appointment as **MASTER PLANNER** for Raigad Fort & Prescient 21 villages as a part of the project covering the conservation and development of Raigad Fort and its heritage precincts. Details of the requirement, eligibility conditions and method of selection etc. are available on the website of Government of Maharashtra at **"www.mahapwd.com & www.mahatenders.gov.in".**

Right to accept or reject the tender has reserved by Collector and Member Secretary, Raigad Development Authority, Raigad - Alibag.

Hard Copy of the Uploaded Documents has to submit in the office of The District Collector and Member Secretary, Raigad Development Authority, Raigad - Alibag.

**Tender ID**

Schedule

| Sr. No. | Stage | Start Date | Start Time | Expiry Date | Expiry Time |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Period of Downloading & Online Submission of bid documents. | 20.06.2022 | 10:00 | 15.07.2022 | 18:00 |
| 2 | Pre Bid Meeting (In the Office of District Collector, Raigad, Alibaug) | Date : 27.06.2022 Time : 11.00 AM (If Possible) | | | |
| 3 | Submission of Hard Copy of the Uploaded Documents. | Upto 18.07.2022 18:00 | | | |
| 4 | Online opening of Technical bid in Office of the Executive Engineer, Road Project Division, Mahad (Special Cell Raigad Fort). | 19.07.2022 | 11:00 | | |
| 5 | Online opening of Financial bid in Office of the Executive Engineer, Road Project Division, Mahad (Special Cell Raigad fort). | Will provide (online) separately after Opening of The Technical Bid. | | | |

**Cost of Tender Form** : Rs. 1,120/-
**Earnest Money Rupees** : Rs. 1,50,000/- only

Sd/-
(Mahesh R. Namade)
Executive Engineer
(Raigad Fort Special Cell)

No. R.F.Sp.Cell/RPD/Mahad/EOI/208
Date : 15/06/2022


## मुरूडमध्ये आता पेऱ्याद्वारे मासेमारी

**मुरूड : प्रतिनिधी**

खोल समुद्रात मासेमारी करण्यावर बंदी असल्याने मुरूड परिसरातील काही मच्छीमार बांधव सध्या समुद्र किनारी किंवा खाडीमध्ये पेऱ्याद्वारे मासेमारी सुरू करतात. पावसाळा सुरु झाला की मासे अंडी घालण्यासाठी किनाऱ्याला येतात, त्यावेळी पेऱ्यामध्ये मासळी सापडते.

समुद्रातील मासेमारीवर बंद असल्याने कोर्लई, बोर्ली, आगरदांडा, राजपुरी आदी बंदरात होड्या किनाऱ्याला लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे मच्छीमार बांधवांनी पेऱ्याद्वारे मासेमारी करण्यावर भर दिला आहे. पेऱ्याद्वारे मासळी पकडण्यासाठी किमान कंबरभर पाण्यात जाऊन जाळे खेचत किनाऱ्याला आणले जाते. जाळ्याच्या दोन्ही बाजूस मोठ्या काठ्या असतात. जाळे ओढताना खूप काळजी व कष्ट घ्यावे लागतात. जाळे मोठे असेल तर ते ओढण्यासाठी माणसे जास्त लागतात. जाळ्याच्या खालची वाळूला टेकावी, यासाठी मध्यभागीसुद्धा काही माणसे ठेवावी लागतात.

पेऱ्याद्वारे करण्यात येणाऱ्या मासेमारीमध्ये सध्या बोईट, फिलसा, खडकपालू, गोबिरी, जिताडा, वडा, मांदेली, बोंबील, छोटी कोलंबी अशा प्रकारची मासळी सापडत आहे. ती बाजारात विकून कोळी बांधव आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. पेऱ्याद्वारे पकडलेली ताजी मासळी पर्यटक त्याच ठिकाणी खरेदी करताना दिसतात. मात्र पेऱ्याद्वारे मासळी कमी प्रमाणात मिळत असल्याने तिचे भावसुद्धा कडाडले आहेत.



(छाया : संजय करडे)

## माणगावमध्ये विवाहित महिलेची आत्महत्या

**माणगाव : प्रतिनिधी**

शहरातील उतेखोलवाडी येथील एका महिलेने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. शर्मिला चंद्रकांत उभारे (वय ३०) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. शर्मिला हिने शनिवारी रात्री ११ ते रविवारी पहाटे २ या कालावधीत राहत्या घराच्या हॉलमध्ये सिलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची माहिती मयत शर्मिलाचा पती चंद्रकांत शांताराम उभारे यांनी माणगाव पोलिसांना दिली. अधिक तपास हवालदार श्री. दोडकुलकर करीत आहेत.

## मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाची निवडणूक वॉर्डनुसार व्हावी; सभासदांची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुका सुपारी खरेदी विक्री संघाच्या वॉर्ड रचनेबाबतची सुनावणी रायगड जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या अलिबाग कार्यालयात मंगळवारी (दि. २१) घेण्यात येणार असल्याची माहिती संघाचे सभासद जनार्दन कंधारे, भाजपचे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, उमेश माळी, विनोद भगत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मुरुड तालुका सहकारी सुपारी खरेदी विक्री संघाचे १३०४ सभासद असून संस्थेची वार्षिक उलाढाल कोट्यवधींची रुपयांची आहे. त्यामुळे या सुपारी संघावर प्राबल्य राखण्यासाठी विविध पक्षातील लोक प्रयत्न करीत असतात. येत्या जुलै महिन्यात या सुपारी संघाची सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. त्यासाठी निवडणूक प्रारूप याद्या तयार करण्याचा कार्यक्रम सहकार खात्यामार्फत जारी करण्यात आला आहे.

पूर्वी सुपारी सुपारी संघाच्या सात वॉर्डमधून सात संचालक निवडून येत होते, परंतु आताच्या निवडणूक कार्यक्रमात सात वॉर्ड मिळून एकच वॉर्ड तयार करण्यात आला आहे. यावर संस्थेचे अनेक सभासद नाराज असून पूर्वीप्रमाणेच सात वॉर्ड पद्धतीने निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी सुपारी संघाचे सभासद सुधीर पाटील, विनोद भगत, जनार्दन कंधारे, जयंत चौलकर, उमेश माळी यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. याबाबतची सुनावणी अलिबाग येथील कार्यालयात मंगळवारी होणार आहे.



(छाया : संजय करडे)

## पराग बोरसे झाले अमेरिकेतील संस्थेचे सदस्य

### पहिले भारतीय चित्रकार

**कर्जत : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार पराग बोरसे (कर्जत) यांची न्यूयॉर्कमधील पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या आंतरराष्ट्रीय कला संस्थेकडून 'सिग्नेचर मेंबर' म्हणून निवड करण्यात आली आहे. हा सन्मान मिळवणारे पराग बोरसे हे एकमेव भारतीय चित्रकार ठरले आहेत.

पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या संस्थेची स्थापना फ्लोरा बी गिफुनी यांनी १९७२ मध्ये केली. ही संस्था अमेरिकेतील सर्वात जुनी पेस्टल सोसायटी आहे. अमेरिकन कलेत ही संस्था सध्याच्या पेस्टलच्या पुनर्जागरणासाठी कार्यरत आहे. न्यूयॉर्कमधील नॅशनल आर्ट्स क्लबमध्ये या सोसायटीचे वार्षिक प्रदर्शन जगभरातील पेस्टल कलाकारांसाठी प्रमुख आकर्षण असते.



चीनमध्ये झालेल्या चित्र प्रदर्शनांत जगातील नामांकित ५० चित्रकारांची चित्रे मांडण्यात आली होती. त्यात कर्जत येथील पराग बोरसे यांच्या एका चित्राचा समावेश होता. बोरसे यांच्या याच चित्राला यापूर्वीही पेस्टल जरनल अमेरिकेच्या मॅगझीनने व्यक्तिचित्रणासाठीचा पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. त्यांच्या चित्रांना परदेशातील अनेक पुरस्कार मिळाले आहेत.


सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | तळोजा ९२९ | तळोजे पाचनंद ८ | १५१/८<br>१५२/२अ<br>१५२/२क<br>१५३/१ब<br>१५३/३अ<br>+४+८अ | ०-०६-८<br>०-३७-०<br>०-१२-०<br>०-०४-८<br>०-२१-८ | ९०० चौ.मी. पैकी ६१९.५८ | भूखंड क्र.१४, सेक्टर-१६, क्षेत्र ६१९.५८ चौ.मी. | **१) कै. नागो उर्फ नागा हरि भोईर (मयत) यांचे वारस**<br>**२) कै. जनाबाई नागो भोईर (मयत) यांचे वारस**<br>१) गणेश नागो भोईर<br>२) सोमा नागो भोईर<br>३) निराबाई शनिवार म्हात्रे<br>४) मुक्ताबाई गोपीनाथ चौधरी<br>५) जिजाबाई अनंता मुंबईकर<br>६) पुष्पा काळूराम घरत<br>७) बेबीबाई गजानन पाटील | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत. तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/११६/२०२२-२३**

# भारत विरुद्ध द. आफ्रिका मालिका बरोबरीत

## निर्णायक सामन्यात पावसाची जोरदार बॅटिंग

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील टी-२० मालिकेतील पाचवा आणि शेवटचा निर्णायक सामना पावसाच्या व्यत्ययामुळे शेवटी रद्द करण्यात आला. दोन्ही संघांनी प्रत्येकी दोन सामने जिंकून मालिकेत बरोबरी साधली होती. शेवटचा सामना रद्द झाल्यामुळे ही मालिका बरोबरीत सुटली आहे.

दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, मात्र खेळाडू मैदानात उतरल्याबरोबरच पहिल्यांदा पाऊस सुरू झाला. त्या वेळी ४५ मिनिटे खेळ थांबला गेला. त्यानंतर ७ वाजून ५० मिनिटांनी खेळ सुरू करण्यात आला. भारतीय संघाला दुसऱ्याच षटकात पहिला धक्का




बसला. लुंगी एनगिडीने सलामीवीर ईशान किशनला बाद केले होते. पाठोपाठ तिसऱ्याच षटकात ऋतुराज गायकवाडही बाद झाला. तिसऱ्या षटकातील तिसरा चेंडू पडल्यानंतर पुन्हा एकदा पावसाला सुरुवात झाली आणि खेळ थांबला. त्या वेळी भारताचा धावफलक दोन बाद २८ असा होता.

बंगळुरूमध्ये पावसाची संततधार सुरूच राहिल्याने शेवटी सामनाधिकाऱ्यांनी लढत रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पाच सामन्यांची मालिका बरोबरीत राहिली आहे. आतापर्यंत झालेल्या चार सामन्यांपैकी दिल्ली आणि कटकमधील टी-२० सामने जिंकून पाहुण्या दक्षिण आफ्रिकन संघाने मालिकेत २-० अशी आघाडी घेतली होती. त्यानंतर मात्र भारतीय संघाने जोरदार मुसंडी मारत विशाखापट्टणम आणि राजकोट येथील दोन्ही सामने जिंकून २-२ अशी बरोबरी साधली होती. त्यामुळे शेवटचा सामना निर्णायक ठरणार होता, पण पावसाच्या व्यत्ययामुळे हा सामना रद्द झाला. चार सामन्यांमध्ये सहा बळी मिळवणाऱ्या भुवनेश्वर कुमारला मालिकावीराचा पुरस्कार देण्यात आला.

# आशियाई स्क्वॉश स्पर्धेत भारताच्या अनाहत सिंगला 'सुवर्ण'

**पटाया : वृत्तसंस्था**

भारताची उदयोन्मुख स्क्वॉशपटू अनाहत सिंगने कनिष्ठ आशियाई अजिंक्यपद स्क्वॉश स्पर्धेतील मुलींच्या १५ वर्षांखालील गटामध्ये सुवर्णपदक जिंकले. थायलंडमधील पटाया येथे झालेल्या या स्पर्धेत १४ वर्षीय अनाहतने हाँगकाँगच्या क्वोंग एनावर अंतिम सामन्यात ३-० अशा फरकाने विजय मिळवत सुवर्णपदक आपल्या नावे केले.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच अनाहतने आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी खेळाडूला पुनरागमन करण्याची कोणतीच संधी दिली नाही व सामना ११-७, १२-१०, ११-५ असा सरळ तीन गेममध्ये जिंकला. तिने अंतिम फेरीपर्यंतच्या आपल्या प्रवासात एकही गेम गमावला नाही. अनाहतने उपांत्य लढतीत मलेशियाच्या अग्रमानांकित इसाबेल विल्सनला ३-० असा पराभवाचा धक्का दिला होता.

अनाहतने आतापर्यंत ४६ राष्ट्रीय स्पर्धा जिंकल्या असून दोन राष्ट्रीय अजिंक्यपदे आणि




दोन आंतरराष्ट्रीय जेतेपदेही तिने पटकावली आहेत. अमेरिकन आणि ब्रिटिश या कनिष्ठ गटांतील दोन स्पर्धा जिंकणारी ती एकमेव भारतीय महिला खेळाडू आहे. आगामी काळात फ्रान्सच्या नॅन्सी येथे होणाऱ्या कनिष्ठ जागतिक अजिंक्यपद स्क्वॉश स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणारी ती सर्वांत युवा खेळाडू ठरेल.

# भारतीय महिला क्रिकेट संघ श्रीलंकेत दाखल



**कोलंबो : वृत्तसंस्था**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला क्रिकेट संघ मर्यादित षटकांच्या मालिकेसाठी श्रीलंकेत श्रीलंकेत दाखल झाला आहे. उभय संघामधील मालिकेला २३ जूनपासून सुरुवात होईल.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारलेली मिताली राज आणि अनुभवी वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामीच्या अनुपस्थितीत भारतीय संघ श्रीलंकेविरुद्ध तीन एकदिवसीय आणि तीन ट्वेन्टी-२० सामने खेळणार आहे. हे सामने अनुक्रमे पालेकेले व दाम्बुला येथे होतील.

रमेश पोवारांच्या मार्गदर्शनाखालील भारतीय संघाचे श्रीलंका क्रिकेट मंडळाने स्वागत केले. या दौऱ्यावर जाण्यापूर्वी बंगळूरुच्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये भारतीय संघासाठी सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# प्रो लीग हॉकी : भारताचे दोन्ही संघ पराभूत

**रॉटरडॅम : वृत्तसंस्था**

भारतीय पुरुष हॉकी संघाला रविवारी (दि. १९) 'एफआयएच' प्रो लीग हॉकी स्पर्धेत नेदरलँड्सकडून २-१ अशा फरकाने हार पत्करावी लागली, तर दुसरीकडे भारतीय महिला संघाला ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या अर्जेंटिनाकडून २-३ अशा पराभवाला सामोरे जावे लागले.

भारतीय पुरुष संघाचा पहिल्या सामन्यात शूट-आऊटमध्ये १-४ असा पराभव झाला होता. त्यामुळे भारताने रविवारच्या लढतीत विजय मिळवणे अनिवार्य होते, मात्र तसे झाले नाही. नेदरलँड्सने १४ सामन्यांत ३५ गुणांसह जेतेपद मिळवले. ऑलिम्पिक विजेता बेल्जियमचा संघ १६



सामन्यांत ३५ गुणांसह दुसऱ्या स्थानी राहिला, तर भारताचे १६ सामन्यांत ३० गुण आहेत.

रविवारी झालेल्या सामन्याच्या सुरुवातीच्या मिनिटालाच अभिषेकने गोल करीत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. सहाव्या मिनिटाला जिप जॅन्सेनला पेनल्टी कॉर्नरची संधी मिळाली. त्याने या संधीचा फायदा घेत गोल केला आणि नेदरलँड्सला १-१ अशी बरोबरी साधून दिली. ४५व्या मिनिटाला जोरीट क्रूनने गोल करीत नेदरलँड्सला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर भारताला गोल करणे शक्य झाले नाही.

महिलांमध्ये एका गोलच्या आघाडीनंतरही भारतीय संघाला ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या अर्जेंटिनाकडून २-३ अशा पराभवाला सामोरे जावे लागले. अर्जेंटिनाने १६ सामन्यांत ४२ गुणांची कमाई करीत महिलांच्या प्रो लीग हॉकीचे जेतेपद मिळवले, तर अजूनही दोन सामने शिल्लक असलेल्या नेदरलँड्सला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. भारताने यंदा या स्पर्धेत पदार्पण करताना १२ सामन्यांत २४ गुणांसह तिसरे स्थान मिळवले.

सामन्याच्या २२व्या मिनिटाला सलिमा टेटेने गोल करीत भारताला आघाडी मिळवून दिली. ही आघाडी भारताने मध्यंतरापर्यंत राखली. तिसऱ्या सत्रात अर्जेंटिनाकडून डेल्फिना थोमेने गोल करीत सामना बरोबरीत आणला. यानंतर युजेनिआ त्रिंचिनेट्टी आणि ऑगस्टिना गोर्झेलानी यांनी पेनल्टी कॉर्नरच्या साहाय्याने गोल करून अर्जेंटिनाला ३-१ अशा मजबूत स्थितीत पोहचवले. चौथ्या सत्रात भारतीय संघाकडून पुनरागमनाचे प्रयत्न सुरू झाले, मात्र अर्जेटिनाच्या बचाव फळीने भारताच्या आघाडीपटूंना कोणतीच संधी न देता आघाडी कायम ठेवली आणि सामना जिंकला.


# विम्बल्डनमधून ओसाकाची माघार; दुखापतीमुळे निर्णय

**लंडन : वृत्तसंस्था**

आघाडीची महिला टेनिसपटू नाओमी ओसाकाने पायाच्या दुखापतीमुळे आगामी विम्बल्डन ग्रँडस्लॅम स्पर्धेतून माघार घेतली आहे. गवताच्या कोर्टवरील या स्पर्धेत ती सलग दुसऱ्या वर्षी सहभाग नोंदवणार नाही.

चार ग्रँडस्लॅम विजेती महिला टेनिसपटू असलेल्या ओसाकाने ट्विटरच्या माध्यमातून विम्बल्डनच्या कोर्टवरील आपले छायाचित्र प्रसिद्ध केले. 'पायाला दुखापत झाल्यामुळे मी तुम्हाला पुढील वर्षी भेटेन,' असा संदेश ओसाकाने या छायाचित्राखाली लिहिला आहे. त्यामुळे ती सलग दुसऱ्या वर्षी सहभाग नोंदवणार नाही.

# डायमंड लीगसाठी नीरज चोप्रा उत्सुक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

फिनलंडमध्ये झालेल्या क्योर्टाने क्रीडा स्पर्धेत वर्षातील पहिले सुवर्णपदक पटकावल्यानंतर ३० जून रोजी स्टॉकहोल्म येथे होणाऱ्या डायमंड लीगमध्ये दमदार कामगिरी करण्यासाठी भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा सज्ज झाला आहे. क्योर्टाने स्पर्धेदरम्यान नीरज पडला होता. सुदैवाने त्याला कोणतीही दुखापत झाली नाही.

'गोल्डन बॉय' नीरज क्योर्टाने स्पर्धेदरम्यान पाय घसरून पडल्यामुळे चाहते चिंतेत होते, मात्र त्याला कोणतीही दुखापत झाली नसल्याचे भारतीय ॲथलेटिक्स महासंघाकडून स्पष्ट करण्यात आले. 'तिसऱ्या प्रयत्नादरम्यान नीरजचा पाय घसरला, पण चिंतेचे कारण नाही. पुन्हा अव्वल दर्जाची कामगिरी केल्याबद्दल नीरजचे अभिनंदन,' असे 'एएफआय'ने आपल्या ट्वीटमध्ये म्हटले.

> **फिनलंडमध्ये वातावरणामुळे भालाफेक करणे आव्हानात्मक ठरले, मात्र क्योर्टाने स्पर्धेत हंगामातील पहिले विजेतेपद मिळवता आले याचे मला समाधान आहे. मी आता स्टॉकहोल्म येथे ३० जूनपासून सुरू होणाऱ्या डायमंड लीगची आतुरतेने वाट पाहतो आहे.**
> **-नीरज चोप्रा**

# पुणे विद्यापीठाच्या संघात अष्टपैलू रसिकाची निवड

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक येथील अष्टपैलू क्रिकेटपटू रसिका प्रदीप शिंदे हिची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. जयपूर (राजस्थान) येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय स्पर्धेत ती विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

लोणावळा येथे झालेल्या आंतरविभागीय स्पर्धेमध्ये रसिकाने उत्कृष्ट कामगिरी केली होती. या कामगिरीच्या जोरावर पुणे विद्यापीठाच्या संघात तिची निवड करण्यात आलेली आहे. यापूर्वीदेखील ऑल इंडिया वुमन्स लीग स्पर्धा शिरपूर (जि. धुळे) येथील सामन्यात रसिकाने अष्टपैलू कामगिरी केली होती.

तिने तीन सामन्यांत नाबाद अनुक्रमे ६८, ३४ व ८४ धावा करून नाशिक संघाला विजेतेपद मिळवून दिले होते.

# 'त्या' कृतीमुळे ऋतुराज ट्रोल

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील रविवारी (दि. १९) झालेल्या निर्णायक पाचव्या सामन्यात जितकी चर्चा पावसाची झाली तितकीच चर्चा सलामीवीर ऋतुराज गायकवाडचीही झाली.



ऋतुराजचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओतील त्याच्या कृतीमुळे त्याला नेटिझन्सच्या टीकेचा सामना करावा लागत आहे.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाचव्या सामन्यात पावसाने दोनदा व्यत्यय आणला. नाणेफेकीनंतर जेव्हा खेळाडूंनी मैदानावर पाय ठेवले तेव्हा लगेचच पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे एकही चेंडू न खेळता खेळाडूंना डगआउटमध्ये जाऊन बसावे लागले. सलामीवीर ऋतुराज गायकवाड आणि ईशान किशननेही डगआऊटचा आसरा घेतला. त्या वेळी एका ग्राऊंड्समनने डगआउटमध्ये येऊन ऋतुराजसोबत सेल्फी घेण्याचा प्रयत्न केला.

ग्राऊंड्समन सेल्फी घेण्याचा प्रयत्न करीत असताना ऋतुराज नाराजी व्यक्त करताना दिसला. त्याने ग्राऊंड्समनला तिथून निघून जाण्यास सांगितले आणि स्वत: मान वळवून घेतली. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या त्याच्या वागणुकीमुळे ऋतुराज ट्रोल होत आहे.

बहुतेक सोशल मीडिया युजर्सनी ऋतुराजच्या अशा वागणुकीवर टीका केली आहे, तर त्याच्या काही चाहत्यांनी कोरोनाचा हवाला देत त्याची पाठराखण करण्याचाही प्रयत्न केला आहे.

# भारत-पाक क्रिकेटपटू एकत्र खेळणार? 'एसीसी' प्रयत्नशील

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तानचे वैर जगविख्यात आहे. अगदी क्रिकेटच्या मैदानातही हे वैर बघायला मिळते, मात्र लवकरच जगभरातील क्रिकेट चाहत्यांना एक अत्यंत दुर्मिळ दृश्य बघायला मिळू शकते. ज्यामध्ये भारतीय क्रिकेटमधील आणि पाकिस्तान क्रिकेटमधील काही अव्वल खेळाडू एकाच संघात खेळताना दिसतील. आशियाई क्रिकेट परिषद (एसीसी) आफ्रो-आशियाई चषक पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. हा चषक २००७मध्ये शेवटचा खेळवला गेला होता. आता पुन्हा २०२३मध्ये हा चषक खेळवला जाण्याचा विचार एसीसी करीत आहे.

एसीसीची ही योजना जर यशस्वी झाली तर विराट कोहली, बाबर आझम, रोहित शर्मा, मोहम्मद रिझवान यांसारखे खेळाडू एकाच संघाकडून खेळताना दिसतील. आफ्रो-आशियाई चषक २००५ आणि २००७ मध्ये आयोजित करण्यात आला होता. त्यात एसीसीला यश आले तर भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, श्रीलंका आणि बांग्लादेशचे खेळाडू एकत्र खेळताना दिसतील. एसीसीचे कमर्शियल आणि इव्हेंट्सचे प्रमुख प्रभाकरन थनराज यांनी फोर्ब्सला सांगितले की, आम्हाला अद्याप क्रिकेट बोर्डांकडून परवानगी मिळणे बाकी आहे. आम्ही बीसीसीआय आणि पीसीबी या दोन्ही क्रिकेट बोर्डांना आमची योजना सादर करण्याचा विचार करीत आहोत. आशियाई इलेव्हनमध्ये खेळण्यासाठी भारत आणि पाकिस्तानमधील सर्वोत्तम खेळाडू घेण्याची आमची योजना आहे.

# आयपीएलमध्ये 'अनसोल्ड' राहिलेल्या खेळाडूची फटकेबाजी

**चेम्साफोर्ड : वृत्तसंस्था**

टी-२० ब्लास्ट २०२२ स्पर्धेतील दक्षिण गटात रविवारी (दि. १९) एक उच्च धावसंख्येचा सामना बघायला मिळाला. चेम्सफोर्ड येथील काउंटी मैदानावर सॉमरसेट आणि एसेक्स यांच्यात हा सामना झाला. रिले रोसौव्ह आणि कर्णधार टॉम ॲबेल यांनी सॉमरसेटच्या संघाला विजय मिळवून दिला. रिले रोसौव्हने ३६ चेंडूत पाच चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने नाबाद ८५ धावा केल्या. इंडियन प्रीमियर लीगच्या लिलावात 'अनसोल्ड' राहिलेल्या रिलेने अवघ्या १९ चेंडूतच आपले अर्धशतक साजरे केले.

१९ चेंडूत अर्धशतक करणाऱ्या रिलेने यावर्षी इंडियन प्रीमियर लीगच्या लिलावात भाग घेतला होता. त्याची मूळ किंमत एक कोटी रुपये होती, मात्र आश्चर्याची गोष्ट म्हणजे दक्षिण आफ्रिकेच्या रिलेला कोणीही खरेदीदार मिळाला नव्हता. त्याच रिलेने टी २० ब्लास्ट लीगच्या सामन्यात चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. संपूर्ण सामन्यादरम्यान दोन्ही संघांनी ३० चौकार आणि २१ षटकार मारले. विजय मात्र, सॉमरसेटच्या



वाट्याला आला. त्यांनी एसेक्सचा आठ गडी राखून पराभव केला.

सॉमरसेटचा हा या स्पर्धेतील सातवा विजय असून गुणतालिकेत ते दुसऱ्या क्रमांकावर पोहचले आहे. सॉमरसेटने आतापर्यंत नऊ सामने खेळून १४ गुण मिळवले आहेत. तर, रिले रोसौव्हने आतापर्यंत नऊ डावांत ७२.९च्या सरासरीने आणि १९२.५ च्या स्ट्राइक रेटने ४३७ धावा केल्या आहेत. त्यात चार अर्धशतकांचाही समावेश आहे. टी २० ब्लास्टच्या या हंगामात सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये तो अव्वल आहे.




हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., ॲट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, ॲस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**